दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

धनत्रयोदशी पहिला
दिवा लागतो दारी,
कंदिल आणि दिव्यांनी रात्र
उजळते सारी रांगोळी,
फटाके आणि फराळाची तर
मजाच न्यारी चला साजरी करूया!
धनत्रयोदशीच्या सर्व
जनतेस हार्दिक शुभेच्छा !
–संपादक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२२६ | शुक्रवार दि.०६ नोव्हेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

जुनाट कायद्यांच्या आधारे चुकीची एफआरपी

साखर, उसाची एफआरपी आणि इथेनॉलचे दर वाढविण्याची दिल्लीत एकमुखी मागणी

पुणे । प्रतिनिधी

केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळत असून, जुनाट कायदे आणि नियमांचा आधार घेऊन उसाची चुकीची रास्त व किफायतशीर किंमत (एफआरपी) निश्चित केली जात आहे. साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) जाणीवपूर्वक वाढवली जात नसल्याने साखर कारखान्यांची आर्थिक कोंडी होत असून त्याचा थेट फटका ऊस उत्पादकांना बसत आहे. केंद्राच्या चुकीच्या साखर धोरणामुळे शेतकऱ्यांची चेष्टा सुरू असल्याचा संताप शेतकरी प्रतिनिधींनी व्यक्त केला. उसाची एफआरपी, साखरेची एमएसपी आणि इथेनॉलचे दर तातडीने वाढविण्याची एकमुखी मागणीही करण्यात आली.

केंद्र सरकारच्या साखर धोरणामुळे ऊस उत्पादकांसमोर निर्माण झालेल्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी निती आयोगाचे माजी सदस्य प्रा. रमेश चंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटमध्ये बैठक घेतली. या बैठकीत महाराष्ट्र आणि कर्नाटकातील शेतकरी प्रतिनिधींनी केंद्र सरकारच्या धोरणांवर जोरदार हल्लाबोल केला. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च, मजुरी आणि शेती निविष्ठांचे दर सातत्याने वाढत असताना सरकार मात्र जुन्याच निकषांवर एफआरपी निश्चित करत असल्याचा आरोप करण्यात आला. काही दिवसांपूर्वी दिल्ली येथे केंद्रीय



कृषिमंत्री, केंद्रीय अन्नमंत्री आणि महाराष्ट्र-कर्नाटकातील ऊस उत्पादकांच्या प्रतिनिधींची बैठक झाली होती. त्यानंतर शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचा अभ्यास करून उपाययोजना सुचविण्यासाठी प्रा. रमेश चंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीमध्ये केंद्रीय कृषी आयुक्त, केंद्रीय अन्न मंत्रालयाच्या साखर विभागाचे सहसचिव आणि केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या कायदेशीर मापनशास्त्र विभागाच्या सहसचिवांचा समावेश आहे. कर्नाटकचा दौरा पूर्ण केल्यानंतर समितीने महाराष्ट्रात येऊन शेतकरी प्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतले. या बैठकीला साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी, शेतकरी संघटनेचे रघुनाथदादा पाटील, शरद जोशीप्रणित शेतकरी संघटनेचे अनिल घनवट, काँग्रेड राजन क्षीरसागर, जालिंदर पाटील, भगवान काटे, शिवाजी माने, विठ्ठल पवार आदी उपस्थित होते. राजू शेट्टी यांनी साखरेची एमएसपी वाढविण्याची मागणी करत केंद्र सरकारच्या धोरणावर टीका केली. साखरेची किमान विक्री किंमत

▶▶ पान २ वर

थोडक्यात...

काँग्रेसची संस्कृती म्हणजे संसदेत गोंधळ–अमित शहा

कर्नाल: काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी संसदेत गोंधळ घालणे आणि कामकाजावर बहिष्कार टाकणे हीच पक्षाची संस्कृती बनवली आहे, अशी टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी केली. लोकशाहीत संसद हे चर्चेचे सर्वोच्च व्यासपीठ असून, विरोधकांनी तेथे विविध मुद्द्यांवर चर्चा करणे अपेक्षित आहे, असे ते म्हणाले. कर्नालमध्ये भाजपच्या 'लोकतंत्र बचाव, अराजकता हटाव' मोर्चाचे नेतृत्व केल्यानंतर आयोजित सभेत शहा बोलत होते. सेक्टर १२ ते दयानंद चौकापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी, केंद्रीय मंत्री मनोहर लाल, भाजप प्रदेशाध्यक्ष अर्चना गुप्ता आणि पक्षाच्या हरियाणा प्रभारी स्मृती इराणी यांच्यासह अनेक नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. राहुल गांधी यांच्यावर टीका करताना शहा म्हणाले की, देशाची ८० वर्षांची लोकशाही अशा राजकीय डावपेचांना बळी पडणार नाही. भाजप संसद, विधानसभा आणि गावपातळीवरही काँग्रेसला प्रत्युत्तर देईल. राहुल गांधी देशात अराजकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

सीजेपीला परदेशी नाहीतर भाजपाकडूनच मदत

दिल्ली: कॉकरोच जनता पार्टीला (सीजेपी) परदेशातून कोणाकडून फंडींग मिळते यामुद्द्यावरून आरोप-प्रत्यारोप सुरू असल्याने राजकीय वातावरण तापले आहे. सीजेपीला अमेरिका आणि पाकिस्तानातून फंडींग मिळाल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला. त्याला प्रत्युत्तर देताना तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी सीजेपीला भाजपकडूनच फंडींग केले जाते, असा 'गुगली' टाकत खळबळ उडवून दिली. या मुद्द्यावरून भाजपकडून होत असलेल्या टीकेला मोईत्रा यांनी उपहासात्मक पद्धतीने उत्तर देत सीजेपीच्या पाठीशी भाजपच आहे, असे विधान केले. 'सीजेपी ला विदेशातून नव्हे, तर भाजपकडून फंडींग मिळते,' असा दावा असे त्या म्हणाल्या. निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून भाजपकडून या संघटनेला निधी मिळाल्याचे सीजेपीच्या सदस्यांनीच सांगितल्याचा हवाला देत मोईत्रा यांनी भाजपला धोबीपछाड दिला. केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी संघटनेचे संस्थापक अभिजीत दिपके यांना अमेरिकेतील देणगीदारांकडून पैसा मिळत असल्याचा दावा केला होता. तसेच सीजेपीचे सहसंस्थापक आशुतोष रांका यांना पाकिस्तानी राजकीय नेत्यांकडून आर्थिक मदत मिळाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या पार्श्वभुमीवर मोईत्रा यांनी भाजपाला उत्तर दिले आहे.

सोशल मीडियावर वाटेल ती पोस्ट करता येणार नाही?

दिल्ली: भारत सरकार सोशल मीडिया कंपन्यांसाठी असलेल्या नियमांमध्ये मोठे बदल करण्याच्या तयारीत आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब आणि एक्स (ट्विटर) यांसारख्या कंपन्यांना त्यांच्या प्लॅटफॉर्मवर युजर्सनी टाकलेल्या पोस्ट, व्हिडिओ किंवा कमेंटसाठी मिळणारे कायदेशीर संरक्षण काढून घेण्याचा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे. यासंदर्भात केंद्रीय माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने चर्चा सुरू केली आहे. सरकारने हा निर्णय घेतल्यास भारतात सोशल मीडिया कंपन्यांच्या कामकाजावर मोठा परिणाम होऊ शकतो. तसेच केंद्र सरकार आणि जगातील मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. कारण सध्या मिळणारे कायदेशीर संरक्षण हे या कंपन्यांच्या व्यवसायाचा महत्त्वाचा आधार आहे.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.०५ नोव्हेंबर २०२६
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

किमान	कमाल	सरासरी
गहू:६.५० क्विंटल		
२,९०१	३,८०१	३,२९५
ज्वारी/हायब्रिड : १४.५० क्विंटल		
२,३१४	५,०००	४,३०६
मका/लोकल: १.०० क्विंटल		
२,३००	२,३००	२,३००
तूर : ५.००क्विंटल		
७,४००	९,८००	८,७३३
उडीद :१.५० क्विंटल		
८,९८१	८,९८१	८,९८१
बाजरी: १.०० क्विंटल		
३,२००	३,२००	३,२००
मुग: २.०० क्विंटल		
९,२००	९,३०१	९,२५०
सोयाबीन: २.५० क्विंटल		
६,७००	६,७००	६,७००
हरभरा: ४.५० क्विंटल		
५,८००	७,१५०	६,५१३

एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड

- १० हजार रुपयांचा बोनस जाहीर
- पहिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा



मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य सरकारने दिवाळी भेट दिली असून, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त १० हजार रुपयांचा बोनस देण्याची घोषणा केली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांसोबत झालेल्या बैठकीनंतर परिवहन मंत्र्यांनी ही घोषणा केली आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य सरकारने दिवाळी भेट दिली असून, परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त १० हजार रुपयांचा बोनस देण्याची घोषणा केली आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांसोबत झालेल्या बैठकीनंतर परिवहन मंत्र्यांनी ही घोषणा केली आहे. एसटी कर्मचाऱ्यांची संघटना आणि परिवहनमंत्र्यांमध्ये झालेल्या बैठकीनंतर एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त १० हजार रुपये बोनस

▶▶ पान २ वर

बीडमध्ये दुष्काळ निवारणासाठी प्रशासनाचे सूक्ष्म नियोजन

जल, चारा आणि रोजगारावर लक्ष केंद्रित करण्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. या पार्श्वभूमीवर, राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात दुष्काळ आढावा बैठक पार पडली. या बैठकीत चारा, पिण्याचे पाणी आणि अपूर्ण योजना यावर प्रामुख्याने चर्चा



झाली असून, पंकजा मुंडे यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील टीमच्या कामाचे कौतुक केले आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केलेल्या सादरीकरणानुसार, यंदा जिल्ह्यात सरासरीच्या केवळ ६३ टक्के पाऊस झाला आहे. यामुळे ७ लाख ८४ हजार ४७९ हेक्टरवरील पिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले असून, प्रशासनाने ७५४ कोटी ७९ लाख रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. शेतकऱ्यांना पीक विम्यापोटी पाच हजार रुपये आगाऊ रक्कम देण्याचे नियोजन आहे. तसेच, मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली दिवाळीची मदत आणि कर्जमाफीची सद्यस्थिती याबाबतही या बैठकीत आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील भूजल पातळीत ४.५५ मीटरने घट झाली असून, १६४ प्रकल्पांमध्ये केवळ १२.०१ टक्के पाणीसाठा उरला आहे. ५१ प्रकल्प कोरडे पडल्याने २९४ टँकर्सद्वारे

▶▶ पान २ वर

गोकुळमधील सत्तासंघर्षावरून राहुल गांधींचा भाजपवर घणाघात!

'दूध उत्पादकांच्या मतांची चोरी करणाऱ्यांना शेतकरी कधीही विसरणार नाही' –सतेज पाटील

कोल्हापूर । प्रतिनिधी

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळमधील सत्तासंघर्ष आता राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. दूध उत्पादकांनी निवडणुकीत दिलेला कौल डावलून शासननियुक्त संचालकांच्या माध्यमातून सत्तेचे गणित बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. 'दूध उत्पादकांच्या मतांची चोरी करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे की, शेतकरी कधीही विसरणार नाही,' असा थेट इशारा त्यांनी भाजपला दिला. दुसरीकडे, काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनीही सरकारच्या निर्णयाविरोधात आक्रमक भूमिका घेत रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे गोकुळमधील सत्तासंघर्षाला आता राजकीय संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

राहुल गांधी यांनी समाजमाध्यमांवरील पोस्टमधून राज्य सरकारच्या निर्णयावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत दूध उत्पादकांनी भाजपचा पराभव केला. मात्र, निवडणुकीनंतर नियमांमध्ये बदल करून चार संचालकांची नियुक्ती करण्यात

▶▶ पान २ वर

बीडच्या दोघांचा संभाजीनगरात जमीन हडपण्याचा डाव!

बनावट दस्त तयार करून बुलडोझरने ताब्याचा प्रयत; दोघांना अटक

बीड । प्रतिनिधी

मुंबई हायवेलगत असलेली मौल्यवान जमीन बनावट कागदपत्रे, खोट्या सह्या आणि बनावट आधारकार्डच्या आधारे परस्पर विक्री करण्याचा प्रयत्न बीडमधील दोघांनी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. एवढेच नव्हे, तर जमिनीचा ताबा मिळवण्यासाठी बुलडोझर आणून साहित्य नष्ट करण्याचाही प्रयत्न झाला. या प्रकरणी छावणी पोलिसांनी शेख हुसेन शेख मोहम्मद फरदुस उर्फ शब्बीर गुलाम अब्बास युसुफ आणि इलीयास फारुकी या दोघांना बीडमधून अटक केली.

अर्पणा सतीश मुंदडा यांच्या वडिलांच्या मालकीची मुंबई हायवे रोडलगत गट क्रमांक १०९ मध्ये जमीन आहे. आरोपींनी संगनमत करून खोट्या सह्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे जमिनीचे बेकायदेशीर दस्त तयार केल्याचा आरोप आहे. इलीयास फारुकी याने बनावट आधारकार्ड तयार करून दिल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. या दोघांची नावे यापूर्वी गेवराई तालुक्यातील सिरसमार्गसह इनामी आणि औकाफ जमीन प्रकरणांतही चर्चेत आली होती. मुंदडा यांच्या

▶▶ पान २ वर

एसआयआरमध्ये वगळलेली नावे पुन्हा समाविष्ट करा

गोवा खंडपीठाचे निवडणूक आयोगाला आदेश



पणजी । वृत्तसंस्था

विशेष सखोल पुनरावलोकन अर्थात एसआयआर प्रक्रियेदरम्यान मतदार यादीतून वगळण्यात आलेली गोव्यातील परेश साळगावकर आणि त्यांच्या कुटुंबातील इतर पाच सदस्यांची नावे पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करा, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने भारतीय निवडणूक आयोगाला दिले आहेत. न्या. वाल्मिकी मेनेझेस आणि न्या. अमित जामसांडेकर यांच्या खंडपीठाने हे निर्देश दिले.

▶▶ पान २ वर

मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या सक्षमीकरणासाठी शासन कटिबध्द

मुंबई । प्रतिनिधी

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा लागू करण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतलेला असून, योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे दुर करून या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण मंत्रीमंडळ उपसमिती अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.



सह्याद्री अतिथिगृह येथे मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. विखे पाटील यांनी, शैक्षणिक सवलती लागू करण्यासाठी आवश्यक ते सर्व शासन निर्णय तात्काळ काढण्यात यावेत, आवश्यकता असल्यास विभागाने प्रस्तावित शैक्षणिक सवलती आणि

▶▶ पान २ वर

अमेरिकेत सत्तांतराची चाहूल; ट्रम्प प्रशासनाच्या अडचणी वाढणार?

जागतिक बाजारपेठेत हालचाली; भारतीय शेअर बाजाराला फायदा होण्याची शक्यता

न्यूयॉर्क । वृत्तसंस्था

अमेरिकेच्या राजकारणात डेमोक्रॅटिक पक्षाची ताकद वाढण्याचे संकेत मिळताच जागतिक आर्थिक बाजारपेठेत हालचाली सुरू झाल्या आहेत. डेमोक्रॅट्सनी सिनेट आणि हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज या दोन्ही सभागृहांवर पुन्हा नियंत्रण मिळवल्यास राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाच्या धोरणांना मोठा अडथळा निर्माण होऊ शकतो. अमेरिकन काँग्रेसमधील सत्तासमीकरण बदलल्यास ट्रम्प यांच्या आयात शुल्कवाढ, युद्धविषयक धोरणे आणि आरोग्यसेवेवरील खर्चकपातीच्या निर्णयांवर मर्यादा येण्याची शक्यता आहे. याचे पडसाद भारतासह जागतिक अर्थव्यवस्थेवर उमटू शकतात.



अमेरिकन डेमोक्रॅटिक काँग्रेसमन रॉबर्ट गार्सिया यांनी रिपब्लिकन सदस्यांना उद्देशून संक्षिप्त पण सूचक सल्ला दिला. हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हजच्या ओव्हरसाइट कमिटीचे अध्यक्षपद भूषवण्याच्या तयारीत असलेल्या गार्सिया यांनी डेमोक्रॅट्सच्या संभाव्य 'ब्लू वेव्ह' विजयाच्या पार्श्वभूमीवर हे विधान केले. डेमोक्रॅट्सचे नियंत्रण प्रस्थापित झाल्यास ट्रम्प प्रशासनाच्या निर्णयांची चौकशी, तपास आणि समन्स बजावण्याच्या माध्यमातून सरकारला धारेवर धरण्याची तयारी सुरू होऊ शकते. या राजकीय घडामोडींचा परिणाम अमेरिकेच्या आर्थिक धोरणांवरही होण्याची शक्यता आहे. विशेषत: संघीय कर्ज मर्यादा वाढवण्याच्या मुद्द्यावर डेमोक्रॅट्सची भूमिका तुलनेने कमी अनुकूल राहिल्यास आर्थिक बाजारपेठेत अनिश्चितता निर्माण होऊ शकते. डॉलरचे मूल्य, सरकारी रोख्यांवरील परतावा आणि गुंतवणुकीच्या प्रवाहावर

▶▶ पान २ वर

महान फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोची निवृत्तीची घोषणा

पोर्तुगाल। वृत्तसंस्था

पोर्तुगालचा महान फुटबॉलपटू आणि पाच वेळा बॅलन डी'ओर विजेता ख्रिस्तियानो रोनाल्डोने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीची घोषणा करून क्रीडा जगताला मोठा धक्का दिला आहे. सोशल मीडियावर एक सविस्तर पोस्ट शेअर करत त्याने हा निर्णय जाहीर केला.

प्रदीर्घ विचारमंथनानंतर पोर्तुगालच्या राष्ट्रीय संघाचे कर्णधारपद आणि आंतरराष्ट्रीय कारकीर्द थांबवण्याचा निर्णय घेतल्याचे त्याने स्पष्ट केले. नोव्हेंबरमधील आंतरराष्ट्रीय ब्रेकनंतर रोनाल्डो आपली ऐतिहासिक नंबर-७ जर्सी संघाकडे परत सोपवणार असून, तो पुन्हा कधीही पोर्तुगालच्या लाल-हिरव्या जर्सीत खेळताना दिसणार नाही. रोनाल्डोने २० ऑगस्ट २००३ रोजी वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी

▶▶ पान २ वर

अग्रलेख

डोनाल्ड ट्रम्प यांची घटती ताकद, मोदी युग आणि भारताची नवी आर्थिक दिशा

वॉशिंग्टनपासून नवी दिल्लीपर्यंतच्या राजकीय पटलावर अलीकडेच एक महत्त्वपूर्ण उलथापालथ पाहायला मिळत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळाची दोन वर्षे पूर्ण झाली असली, तरी आता पुढील दोन वर्षांत त्यांच्या हातात पूर्वीसारखा अमर्याद अधिकार उरलेला नाही. अमेरिकेतील नोव्हेंबर २०२६ च्या मध्यावधी निवडणुकांमध्ये ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला मोठा धक्का बसला असून, डेमोक्रॅट्स पक्षाने सीनेटमध्ये ५४ जागांवर दणदणीत बहुमत मिळवले आहे. अमेरिकन संविधानाच्या २२ व्या घटनादुरुस्तीनुसार ट्रम्प यांना तिसऱ्यांदा निवडणूक लढवता येणार नाही, आणि आता संसदेत विरोधी पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित झाल्यामुळे त्यांना 'लॅम डक' म्हणून कारभार करावा लागणार आहे. या राजकीय परिवर्तनाचा जागतिक राजकारणावर, 'मोदी युगावर' आणि भारताच्या अर्थव्यवस्थेवर नेमका काय परिणाम होईल, याचा वेध आता घेण्यात येवू लागला आहे.

मेरिकेच्या संसदेत डेमोक्रॅट्सचे वर्चस्व निर्माण झाल्यामुळे ट्रम्प यांच्या एकतर्फी धोरणांना मोठा चाप बसला आहे. 'अमेरिका फर्स्ट'च्या नारा देत वाढवलेले टॅरिफ आणि अनिश्चित व्यापारी धोरणांना आता अमेरिकन संसदेच्या दबावामुळे मर्यादा आल्या आहेत. इराण संघर्ष आणि मध्य पूर्वेतील युद्धांमध्ये अमेरिकेच्या हस्तक्षेपावर संसदेकडून कडक आर्थिक नियंत्रण आणले जाईल, ज्यामुळे जागतिक ऊर्जा बाजाराला स्थिरता मिळेल. फेडरल रिझर्व्ह आणि जागतिक शेअर बाजारावर ट्रम्प यांच्या अनिश्चित निर्णयांचा होणारा मारा आता कमी होईल. 'ट्रम्प यांची ताकद संपल्याने नरेंद्र मोदींचे आंतरराष्ट्रीय राजकारण धोक्यात येईल का?' हा सध्याचा सर्वात मोठा प्रश्न आहे. परंतु, आंतरराष्ट्रीय संबंध हे केवळ व्यक्तिगत मैत्रीवर नव्हे, तर राष्ट्रीय हितसंबंधांवर चालतात.

धोरणात्मक भागीदारी कायम: चीनच्या वाढत्या आक्रमकतेला रोखण्यासाठी अमेरिकेला भारताची गरज कायम आहे. त्यामुळे राष्ट्राध्यक्षपदावरील व्यक्ती बदलली तरी भारत-अमेरिका धोरणात्मक संबंधांवर फारसा विपरीत परिणाम होत नाही. डेमोक्रॅट्सच्या वाढत्या प्रभावामुळे भारतावर लादले जाणारे अन्यायी टॅरिफ रोखले जाण्यास मदत होईल. तसेच, क-१ इ व्हिसाच्या नियमांमध्ये भारतीय आयटी प्रोफेशनल्सना काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता वाढली आहे. 'मोदी युगाचे' भवितव्य अमेरिकेतील घडामोडींवर नाही, तर भारतातील देशांतर्गत विकास, रोजगार, महागाई आणि राजकीय समीकरणांवर अवलंबून आहे. अमेरिकेत ट्रम्प बॅकफूटवर गेल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था आणि आशियाई व्यापाराला खालीलप्रमाणे मोठे फायदे मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमेरिकेकडून भारतावर लादला जाणारा एकतर्फी दबाव कमी होईल आणि समान पातळीवर व्यापार करार होण्याचा मार्ग मोकळा होईल. मध्य पूर्वेतील तणाव निवळल्याने कच्च्या तेलाच्या किमती नियंत्रणात राहतील, ज्याचा थेट सकारात्मक परिणाम भारताच्या चालू खात्यातील तुटीवर होऊन रुपया मजबूत होईल. अमेरिकेच्या धोरणात्मक अनिश्चिततेला लगाम बसल्यामुळे भारतीय आयटी कंपन्यांना (उदा. टीसीएस, इन्फोसिस, विप्रो) नवीन आणि दीर्घकालीन करार मिळणे सुलभ होईल. भारत, बांगलादेश आणि व्हिएतनाम यांसारख्या आशियाई देशांवरील अचानक लादले जाणारे टॅरिफ थांबल्याने आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास आणखी वाढेल.

थोडक्यात सांगायचे तर, डोनाल्ड ट्रम्प आपले उर्वरित दोन वर्षे राष्ट्राध्यक्ष म्हणून पूर्ण करतील, परंतु वॉशिंग्टनमध्ये आता निर्णय लादण्याचे त्यांचे अधिकार संसदेच्या अंकुशामुळे मर्यादित झाले आहेत. जागतिक राजकारण पुन्हा एकदा एकतर्फी निर्णयांकडून समतोलाकडे झुकत आहे. भारतासाठी ही एक उत्तम संधी आहे-आपली आर्थिक बाजू अधिक मजबूत करण्याची आणि अमेरिकेसोबत समान पातळीवर आर्थिक व सामरिक संबंध प्रस्थापित करण्याची.!

बोधेगाव ग्रापंतील कोट्यवधींच्या घोटाळ्याविरोधात जि.प समोर आमरण उपोषण

आंदोलन करताना अभियंत्याने धमकावल्याची चर्चा

बीड / परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मौजे बोधेगाव ग्रामपंचायतीमध्ये वित्त आयोग व विविध विकास योजनांच्या निधीत कोट्यवधी रुपयांचा अपहार झाल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वारंवार तक्रारी व पुरावे देऊनही प्रशासनाकडून कारवाई आणि एफआयआर नोंदवण्यात टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप करत, मुख्य तक्रारदार अक्षय अशोकराव शिंदे यांच्यासह ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर केले आहे. मागण्या मान्य न झाल्यास संपूर्ण कुटुंबासह जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणाला सुरवात करण्यात आली.

ग्रामस्थांनी निवेदनात दिलेल्या माहितीनुसार, बोधेगाव ग्रामपंचायतीत मागील २५ वर्षांपासून एकाच घराण्याची सत्ता असून सरपंच सौ. सुरेखा ज्ञानोबा गडदे, ग्रामसेवक सौ. मायादेवी पोतभरे, रोजगार सेवक व संबंधित पंचायत समिती अधिकाऱ्यांच्या संगनमताने शासकीय निधीची लूट झाल्याचा दावा करण्यात आला आहे. 'मेरी पंचायत' ॲपवरील नोंदींचा दाखला देत ग्रामस्थांनी नमूद केले की, ₹२.७१ लाख खर्चाची मुतारी (४१०१७९५७), ₹१०.७८ लाख खर्चाची विहीर (५०४२९८५१) आणि ₹२.४४ लाख खर्चाची नाली (६०३७७३६५) यासह तब्बल २० हून अधिक कामे पूर्ण दाखवली असली तरी प्रत्यक्षात जागेवर काहीच अस्तित्वात नाही. याशिवाय हँडवॉशचे ₹१,४०० चे बिल ₹१४,००० आणि पाण्याच्या टाकीचे ₹१०,००० चे बिल थेट ₹१०.७८ लाख दाखवून तब्बल १० पट जादा बिले उचलण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या गैरव्यवहाराबाबत ग्रामस्थांनी २० जुलै, १९ ऑगस्ट व २८ सप्टेंबर २०२६ रोजी पुराव्यानिशी तक्रारी दाखल केल्या होत्या. मात्र, पंचायत समिती परळीने ४ ऑगस्ट रोजी केवळ बोगस पाहणी केल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच, २८ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीच्या अर्धा तास आधी संशयित व्यक्तींना दालनात बोलावण्यात आले आणि तक्रारदारांचे गोपनीय पुरावे आधीच विरोधकांना पुरवण्यात आले, असा आरोप करत ग्रामस्थांनी २८ सप्टेंबर २०२६ रोजीच्या दुपारी ३:३० ते ५:०० या वेळेतील सीईओंच्या दालनातील आवाजासह सीसीटीव्ही फुटेजची मागणी केली आहे. परळीच्या अधिकाऱ्यांना वगळून बीडच्या वरिष्ठ पथकामार्फत (मुख्य लेखा व वित्त अधिकारी + कार्यकारी अभियंता) प्रत्यक्ष 'ऑन कॅमेरा' पाहणी करावी. मनरेगा अंतर्गत केवळ कागदावर मंजूर दाखवलेल्या विहिरींची 'ऑन कॅमेरा' तपासणी करून संबंधितांवर फौजदारी कारवाई व वसुली करावी.अशी मागणी मुख्य तक्रारदार अक्षय शिंदे यांच्यासह लक्ष्मण बाबुराव गडदे, संभाजी हरिभाऊ शिंदे, बळीराम गडदे, वसंत सदाशिव बनसोडे, विनायक गडदे, मोहन बनसोडे, दत्ता सुभाष शिंदे आदीने केली आहे दरम्यान जिल्हा परिषद समोर सुरू असलेली उपोषण सोडवण्यासाठी आलेल्या सय्यद मुजाहिद या अभियंत्याने उपोषणकर्त्यांना दमदाटी करून उपोषण मागे घ्या अन्यथा परिणाम वाईट होतील असा इशारा दिला असल्याचे उपोषणकर्त्याचे म्हणणे आहे.

आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नांना यश!

भानुदास परकाळे यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५० हजारांची आर्थिक मदत मंजूर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे लोकनेते आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक मदत मिळवून देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. याच सामाजिक बांधिलकीच्या कार्यातून घुमर पिंपरी (ता. आष्टी) येथील भानुदास परकाळे यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेंतर्गत ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे.

गंभीर आजारपण किंवा महागड्या वैद्यकीय उपचारांचा खर्च सर्वसामान्य कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या अडचणीत आणतो. अशा परिस्थितीत गरजू रुग्णांना शासकीय योजनांच्या माध्यमातून मदतीचा हात मिळवून देणे ही अत्यंत महत्त्वाची सामाजिक जबाबदारी आहे. हीच भूमिका लक्षात घेऊन आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली भानुदास परकाळे यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास सकारात्मक प्रतिसाद मिळत दिनांक ५ नोव्हेंबर २०२६ रोजी ५० हजार रुपयांची मदत मंजूर झाल्याचे अधिकृत मंजुरीपत्र प्राप्त झाले आहे. त्यामुळे परकाळे कुटुंबाला वैद्यकीय उपचारांच्या खर्चासाठी मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. 'एकही रुग्ण पैशांअभावी उपचारांपासून वंचित राहू नये' या सामाजिक भावनेतून आमदार सुरेश आण्णा धस यांच्याकडून गरजू रुग्णांना शासकीय वैद्यकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत यांसह विविध योजनांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदत मिळवून देण्याचे काम त्यांच्या आरोग्य सहाय्यता यंत्रणेमार्फत सुरू आहे. राजकारणापलीकडे जाऊन सामान्य माणसाच्या संकटात धावून जाणे, रुग्णांच्या कुटुंबीयांना आधार देणे आणि उपचारांसाठी आर्थिक मदतीचा मार्ग उपलब्ध करून देणे, हीच लोकसेवेची खरी ओळख आहे. भानुदास परकाळे यांना मिळालेली ही मदत म्हणजे गरजूंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या कार्याची आणखी एक सकारात्मक पावती ठरत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मिळालेल्या या आर्थिक मदतीबद्दल परकाळे कुटुंबीयांनी आमदार सुरेश आण्णा धस यांचे आभार व्यक्त केले आहेत.



फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीचा माणुसकीचा दिवाळी उपक्रम

अनाथ, निराधार आणि वृद्धांच्या चेहऱ्यावर फुलवला आनंद!



माजलगाव । प्रतिनिधी

शिक्षणासोबतच सामाजिक संस्कारांची जपणूक करीत फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी व ज्युनिअर कॉलेजने यंदाची दिवाळी अनाथ, निराधार, कष्ट बाधित बालके, विधवा महिला व वृद्धांसोबत साजरी करत माणुसकीचे अनोखे दर्शन घडविले.

विविध ठिकाणी मदत वाटप : या उपक्रमात पाली येथील आनंदग्राम येथे कष्ट बाधित मुले व विधवा महिलांना दिवाळी फराळ, चप्पल किट व जीवनावश्यक वस्तू देण्यात आल्या. पसायदान सेवा प्रकल्प अनाथ आश्रम ढेकनमोहा येथे फराळ, धान्य व किराणा सामानाचे वाटप करण्यात आले. गेवराई येथील सहारा अनाथालय बालग्राम येथे दिवाळी फराळ व जीवनावश्यक वस्तूंचे किट देऊन मुलांसोबत आनंद साजरा करण्यात आला. तसेच शिरूर येथील आजोळ वृद्धाश्रम व पाथरी येथील ओंकार वृद्धाश्रमात वृद्धांसाठी फराळ, धान्य व किराणा वाटप करण्यात आले.या उपक्रमासाठी विशेष बाब म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वत:हून दिवाळी फराळ जमा करून पाठविला.शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व वाहनचालकांनी मदतीच्या भावनेतून आर्थिक योगदान दिले. यात संस्थेनेही मोठा आर्थिक वाटा उचलला. त्यामुळे हा उपक्रम केवळ दिवाळी फराळ वाटप न राहता विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव रुजविणारा संस्कारमय अनुभव ठरला. या उपक्रमाची संकल्पना संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक,यांच्या उदात्त हेतूने मुख्याध्यापिका सौ. सारिका बजाज, ऐश्वर्या चांडक, रमेश बाहेती, उपमुख्याध्यापक सचिन गायकवाड व उपमुख्याध्यापिका ज्योती बनसोडे यांच्या प्रत्यक्ष सहभागातून साकार झाली.संपूर्ण उपक्रमाची प्रमुख जबाबदारी हितेंद्र काळे यांनी समर्थपणे पार पाडली. त्यांना आकाश पवार यांच्यासह सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व वाहनचालकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आ.अमित गोरखे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी उपजिल्हा रुग्णालयात फळवाटप

यूथ फाऊंडेशनच्या वतीने सामाजिक उपक्रम; रुग्णांना फळांचे वाटप करून वाढदिवस साजरा

बीड । प्रतिनिधी

मातंग समाजभूषण तथा विधानपरिषद आमदार मा. अमित गोरखे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळांचे वाटप करून सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू आणि रुग्णांच्या सेवेतून साजरा करण्याचा स्तुत्य उपक्रम आमदार अमित गोरखे साहेब यूथ फाऊंडेशन, बीड जिल्ह्याच्या वतीने आयोजित करण्यात आला.



यावेळी रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांची विचारपूस करून त्यांना फळांचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. आ. अमित गोरखे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या सामाजिक उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. समाजसेवा, रुग्णसेवा आणि सामाजिक बांधिलकी जपणारे असे उपक्रम भविष्यातही राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. आ. अमित गोरखे साहेब यूथ फाऊंडेशन, बीड जिल्हाध्यक्ष दशरथ भाऊ कुचेकर, युवा नेते सचिन भैय्या कसबे, विलास भाऊ अवचार, विशाल भैय्या गवळी, भरत जाधव, अमोल कसबे सर, भारत कुचेकर, गणेश कोळी, अनंत उजगरे सर, नंदकुमार कुचेकर, नवनाथ कुचेकर आदींच्या पुढाकारातून हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

पान १ वरून...

जुनाट कायद्यांच्या आधारे

वाढविल्याशिवाय साखर कारखान्यांना आर्थिक दिलासा मिळणार नाही आणि त्यातूनच ऊसदराची कोंडी फुटू शकेल, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रकाश बालवडकर आणि ड. योगेश पांडे यांनीही उत्पादन खर्चातील वाढीकडे केंद्र सरकार दुर्लक्ष करत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. साखरेची एमएसपी वाढत नसल्याने कारखान्यांना शेतकऱ्यांची एफआरपी देताना अडचणी येत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.रघुनाथदादा पाटील यांनीही केंद्राच्या साखर धोरणावर जोरदार टीका केली. दोन साखर कारखान्यांमधील हवाई अंतराची अट रद्द करण्याची मागणी त्यांनी केली. एकीकडे ऊस उत्पादकांचा खर्च वाढत असताना दुसरीकडे साखरेचे दर, इथेनॉलचे दर आणि एफआरपी याबाबत सरकारकडून ठोस निर्णय घेतला जात नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडत असल्याचा सूर बैठकीत उमटला. आता चंद समिती या मागण्यांवर काय शिफारशी करते आणि केंद्र सरकार त्यावर कोणता निर्णय घेते, याकडे ऊस उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

बीडमध्ये दुष्काळ निवारणासाठी

पाणीपुरवठा सुरू आहे. पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने २७१० अवैध पाणी जोडण्या खंडित करून २६६ पंप जप्त केले आहेत. पंकजा मुंडे यांनी भूजल पातळी कमी होण्यावर चिंता व्यक्त करत, पाणीटंचाईवर मात करण्यासाठी पुढील पावसाळ्यापर्यंतचे सूक्ष्म नियोजन करण्याच्या आणि प्रलंबित पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. जिल्ह्यात सध्या उपलब्ध असलेला चारा केवळ २६ दिवस पुरेल असा अंदाज आहे. वसुबारस आणि गोवर्धन पूजेचा संदर्भ देत, पंकजा मुंडे यांनी पशुधनाच्या सद्यस्थितीवर विशेष चिंता व्यक्त केली. माणसांप्रमाणेच मुक्या प्राण्यांनाही पाण्याचा आणि चाऱ्याचा त्रास होत असल्याचे त्या म्हणाल्या. वन विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि सीएसआरच्या माध्यमातून चारा निर्मितीचे नियोजन करण्यात आले आहे. भविष्यात चारा छावण्यांची गरज भासल्यास त्यात 'जिओ फेन्सिंग' आणि जनावरांच्या टॅगिंगचा वापर करण्याचे ठरले आहे. बीड आणि जालना येथील स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यावरही या बैठकीत चर्चा झाली. महिला बचत गटांच्या माध्यमातून जालना आणि बीडच्या रेशीम व हातमाग उत्पादनांचा स्वतंत्र ब्रँड तयार करून महिलांना रोजगार मिळवून देण्याचे नियोजन असल्याचे पंकजा मुंडे यांनी सांगितले. दुष्काळी परिस्थितीत मजुरांचे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत 'गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार', नाला खोलीकरण आणि जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. या सर्व उपाययोजनांची योग्य अंमलबजावणी करून प्रशासनाने सर्वसामान्यांना व शेतकऱ्यांना वेळेवर मदत पोहोचवावी, असे निर्देश मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले आहेत. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्यासह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

एसटी कर्मचाऱ्यांची

देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोबतच कर्मचाऱ्यांना २२ हजार रुपयांची उचल घेता येणार आहे. उचल केलेले पैसे नंतर पगारामधून वळते केले जातील. याबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, एसटीच्या कर्मचाऱ्यांना दिवाळीचा बोनस जाहीर केला आहे. आज दिवाळीचा पहिला दिवस आहे. आजच त्यांचं तोंड गोड केलं आहे. त्यामुळे ते प्रवाशांना अधिक वेठीस धरण्याचा प्रयत्न ते करणार नाहीत, असं मला वाटतं. तसेच पुकारलेला संप ते मागे घेतील. तसेच त्यांच्या मागण्यांबाबत दिवाळीनंतर आम्ही बैठक घेऊ, असे प्रताप सरनाईक म्हणाले. प्रताप सरनाईक पुढे म्हणाले की, एसटीच्या सर्व कामगार प्रतिनिधींना माझं हेच सांगणं आहे की, एसटी महामंडळ तुम्हाला जेवढं देता येईल तेवढं देत आहे. माझ्या माध्यमातून, एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून आणि गरज पडली तर मुख्यमंत्र्यांनाही आम्ही निर्णय घ्यायला सांगतो. असं असताना संपासारखं हत्यात कुठेही उपसू नये, अशी विनंती मी त्यांना वारंवार करत आलो आहे. आजही त्यांनी ज्या मागण्या केल्या, त्याला फार वेळ न घेता, सर्व अधिकाऱ्यांशी चर्चा करून एसटी महामंडळाची परिस्थिती नसतानाही आम्ही हा निर्णय घेतला आहे. याचा विचार करून त्यांनीही संपासारख्या हत्याराचा वापर करणं योग्य नाही, असेही प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

बीडच्या दोघांचा संभाजीनगरात

तक्रारीवरून छावणी पोलीस ठाण्यात फसवणूक, बनावट दस्तऐवज आणि कट रचल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, अर्पणा मुंदडा यांच्या तक्रारीवरून छावणी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१८(४), ३४०(२), ३२९(३), ३३६(३), ६१(२) आणि ३(५) अंतर्गत फसवणूक, बनावट दस्तऐवज तयार करणे आणि कट रचल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोकुळमधील सत्तासंघर्षावरून राहुल

आली आणि संचालकांचे संख्याबळ १२ वरून १६ करण्यात आले, असा आरोप त्यांनी केला. हा केवळ संचालकांचा आकडा वाढवण्याचा प्रकार नसून बहुमताची चोरी आणि दूध उत्पादकांच्या मतांची चोरी आहे. जनादेशात भेसळ करून सत्ता मिळवण्याचा हा प्रयत्न असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले आहे. भाजप सत्तेसाठी कोणत्याही थराला जात असल्याचा आरोप करत राहुल गांधी यांनी दूध उत्पादकांच्या कौलाचा अनादर केला जात असल्याचे सांगितले. जनतेने नाकारल्यानंतरही नियम बदलून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला जात असेल, तर दूध उत्पादक हे कधीही विसरणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला. गोकुळच्या २५ संचालकांपैकी काँग्रेस आमदार सतेज पाटील यांच्या गटाचे १३ संचालक निवडून आले आहेत, तर महायुतीकडे १२ संचालक आहेत. निवडणुकीत बहुमत मिळवूनही अध्यक्षपदाच्या निवडीत शासननियुक्त संचालकांच्या माध्यमातून संख्याबळ बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप सतेज पाटील यांनी केला आहे. साडेपाच लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या संसाराचा आधार असलेल्या गोकुळमध्ये सरकारने हस्तक्षेप करू नये, अशी त्यांची भूमिका आहे. एकीकडे मतदारांचा कौल मान्य केला जात नाही आणि दुसरीकडे बहुमत आपल्याकडे वळवून घेतले जात आहे. गोकुळ डोळ्यासमोर ठेवूनच कायद्यात बदल केला जात आहे,' असा आरोप सतेज पाटील यांनी केला. साडेपाच लाख दूध उत्पादकांच्या हिताशी निगडित असलेल्या संघात अशा प्रकारे हस्तक्षेप करणे योग्य नसल्याचे सांगत त्यांनी सरकारच्या निर्णयावर आक्षेप घेतला. ज्यांना दूध उत्पादकांनी निवडणुकीत नाकारले, ते तज्ज्ञ संचालक कसे होऊ शकतात, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. गोकुळ हा अमूलनंतर मोठ्या दूध संकलन क्षमतेचा संघ असून, दररोज सुमारे २० लाख लिटर दूध संकलन होत असल्याचा उल्लेख करत सतेज पाटील यांनी या संस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. या संस्थेवर नियंत्रण मिळवण्यासाठीच कायद्यात बदल केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. सरकारचा हा निर्णय मान्य नसून, त्याविरोधात आता रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. 'सत्तेत येण्यासाठी एवढा अट्टाहास कशासाठी? हा लोकशाही संपवण्याचा प्रयत्न आहे. आमचा न्यायालयावर विश्वास आहे,' असे सांगत सतेज पाटील यांनी न्यायालयीन लढाईचे संकेत दिले. शासननियुक्त संचालकांच्या नियुक्तीला आमचा विरोध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. एकीकडे निवडणुकीत मिळालेल्या बहुमताचा दाखला देत सतेज पाटील गट शासनाच्या हस्तक्षेपाला विरोध करत आहे, तर दुसरीकडे तज्ज्ञ संचालकांच्या नियुक्तीचे समर्थन करत सत्ताधारी बाजूने आपली भूमिका मांडली जात आहे. त्यामुळे गोकुळच्या अध्यक्षपदाची निवड केवळ सहकारी संस्थेपुरती मर्यादित न राहता राज्यातील सत्ताधारी आणि विरोधकांमधील प्रतिष्ठेची लढाई बनली आहे. आता शासननियुक्त संचालकांच्या नियुक्तीला न्यायालयात आव्हान दिले जाते का आणि अध्यक्षपदाच्या निवडीत या बदलांचा नेमका काय परिणाम होतो, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

शासनाकडून कायद्यात बदल करीत संचालकांची नियुक्ती

गोकुळमध्ये अध्यक्षपदाच्या निवडीवरून निर्माण झालेल्या पेचाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने सहकार कायद्यात बदल करून शासननियुक्त संचालकांचा मार्ग मोकळा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार पाच शासननियुक्त संचालकांची नियुक्ती करण्याची तरतूद करण्यात आली असून, त्यापैकी चार संचालकांना मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळे गोकुळमधील सत्तेचे गणित बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

९ नोव्हेंबरला कोल्हापुरात संघर्ष मोर्चा...

पाटील यांनी सांगितले की, ९ नोव्हेंबरला सकाळी १० वाजता कोल्हापुरातील दसरा चौकातून संघर्ष मोर्चा काढणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा निघेल. आम्ही कोल्हापूरचा संघर्ष मोर्चा म्हणून रस्त्यावर उतरणार आहोत. रस्त्यावरची लढाई करायला मागे पडणार नाही. हा अपमान निवडून दिलेल्या लोकांचा आहेच शिवाय स्वाभिमानी कोल्हापूरकरांचा अपमान आहे. सर्व कोल्हापूरकरांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

शासनाचा निर्णय टिकणार नाही - माजी सर न्यायाधीश गवई

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ) अध्यक्ष निवडीसाठी १० नोव्हेंबर रोजी बैठक घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने दिले आहेत. आता राज्य सरकारने अध्यादेश आणून तज्ज्ञ व शासकीय स्वीकृत संचालकांना मतदानाचा अधिकार दिल्यास तो कायदा आणि संविधानाच्या चौकटीत टिकणार नाही, असा कायदेशीर सल्ला माजी सरन्यायाधीश बी.आर. गवई यांनी दिला आहे. असा अध्यादेश म्हणजे मनमानी कारभार आणि अधिकारांचा गैरवापर ठरेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. कलम ७३ अ आणि २७(९) नुसार स्वीकृत व शासकीय नामनिर्देशित संचालकांना अध्यक्ष किंवा इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत मतदानाचा अधिकार नाही. बहुमताचा कौल नाकारण्यासाठी अध्यादेशाद्वारे हा अधिकार देणे हे राजकीय हेतूने प्रेरित असून लोकशाही मूल्यांच्या विरोधी आहे, असेही गवई यांनी स्पष्ट केले.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या

शिष्यवृत्ती योजनांसाठी आगामी हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांद्वारे आर्थिक तरतूद करण्याचे निर्देश दिले. मराठा समाजातील बेरोजगार युवक-युवतींसाठीची मोटार वाहन चालक-वाहक प्रशिक्षण योजना केवळ पुणे येथे केंद्रित न ठेवता जिल्हास्तरावर राबवावी. त्यासाठी सारथीने जाहिरात प्रसिद्ध करून इच्छूक संस्थांकडून अर्ज मागवावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. इयत्ता ५ वी ते १० वी या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थींनींना शालेय शिक्षण विभागामार्फत शिष्यवृत्ती योजना, परराज्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्काव्यतिरिक्त प्रयोगशाळा शुल्क यांसह विविध

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. ०५ नोव्हेंबर २०२६
३

थोडक्यात

माजी सैनिक संवर्गातून शारीरिक प्रशिक्षक पद भरणार

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाद्वारे स्थापन करण्यात आलेल्या मुलांच्या सैनिक सेवापूर्व शिक्षण संस्था(SPI), छत्रपती संभाजीनगर येथे शारीरिक प्रशिक्षक निदेशक (PTI) गट-क संवर्गातील एक रिक्त पद ११ महिन्यांच्या करार पद्धतीने भरण्यात येणार आहे.

या पदासाठी माजी सैनिक संवर्गातील पात्र उमेदवारांना प्राधान्य देण्यात येणार आहे. माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास इतर नागरिकांमधील बीपीएड, एमपीएड, साई/एनआयएस प्रशिक्षक पात्रताधारक उमेदवारांचा विचार करण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता आवश्यक कागदपत्रांसह मुलाखतीसाठी सैनिक सेवापूर्व शिक्षण संस्थेत उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे संचालक तथा निवृत्त कर्नल मकरंद देशमुख यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९४२३२५३६६८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी १६० कोटी रुपयांचे विशेष पॅकेज

बीड । प्रतिनिधी

राज्य शासनाने 'विकसित महाराष्ट्र २०४७' अंतर्गत कातकरी, कोलाम व माडिया या आदिम जमातींसह पारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात १६० कोटी रुपयांच्या विशेष पॅकेजची तरतूद केली आहे. यापैकी आदिम जमातींसाठी १३० कोटी रुपये, तर पारधी समाजासाठी ३० कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. वैयक्तिक आणि सामूहिक लाभाच्या योजनांसाठी १०० टक्के शासकीय अनुदान देण्याची तरतूद या पॅकेजमध्ये करण्यात आली आहे.

आदिम समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष पॅकेजद्वारे निधी उपलब्ध करून देण्याची घोषणा २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली होती. त्यानुसार राज्य शासनाने २ नोव्हेंबर २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करून या पॅकेजची अंमलबजावणी सुरू केली आहे. आदिम जमाती पॅकेजमधील १३० कोटी रुपयांपैकी १०० कोटी रुपये मूलभूत सोयी-सुविधांसाठी, तर ३० कोटी रुपये वैयक्तिक आणि सामूहिक लाभाच्या योजनांसाठी वापरण्यात येणार आहेत. पारधी समाजासाठीच्या ३० कोटी रुपयांपैकी १० कोटी रुपये मूलभूत सोयी-सुविधांसाठी आणि २० कोटी रुपये वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या योजनांसाठी उपलब्ध असतील.

एसटीच्या ८३ हजार कर्मचाऱ्यांना दहा हजार रुपये दिवाळी भेट

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ८३ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करण्यासाठी प्रत्येकी १० हजार रुपये सानुग्रह अनुदान, पात्र कर्मचाऱ्यांना १२,५०० रुपये सण उचल आणि महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी जाहीर केला.

''एसटीचे अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र मेहनत करून लाखो प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची सेवा देतात. त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून दिवाळीच्या सणानिमित्त त्यांना सानुग्रह अनुदान देणे हे केवळ औदार्य नसून त्यांचा हक्क आहे. या निर्णयामुळे महामंडळावर सुमारे १६० कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार असला, तरी कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, हे आमचे कर्तव्य आहे,'' असे प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

लाखो रुपयांचा चुराडा; जिल्हा परिषदेत भरवलेल्या प्रदर्शनाकडे 'उमेद'च्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची पाठ!

ग्राहकांअभावी बचत गटांचे स्टॉल्स थंड; कृषी व पशुसंवर्धन विभागाचे स्टॉल ठरले केवळ शोभेची वस्तू

बीड । प्रतिनिधी

'आकांक्षा' तालुका कार्यक्रमांतर्गत 'व्होकल फॉर लोकल' या संकल्पनेवर आधारित बीड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात महिला बचत गटांच्या उत्पादनांच्या विक्री व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, प्रशासकीय कार्यक्रम असतानाही बीड जिल्हा परिषदेतील 'उमेद' अभियानाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीच या प्रदर्शनाकडे पाठ फिरवल्याने हा संपूर्ण कार्यक्रम ग्राहक व प्रेक्षकांविना अक्षरशः थंड पडल्याचे चित्र पाहायला मिळाले.

प्रतिवर्षीप्रमाणे दिवाळीच्या निमित्ताने बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळावी म्हणून हे प्रदर्श भरवले जाते. यंदा प्रामुख्याने वडवणी तालुक्याच्या वतीने जिल्हा परिषदेच्या प्रांगणात ४ आणि ५ नोव्हेंबर रोजी या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. स्टेज डेकोरेशन, मंडप, पिण्याचे पाणी यासह इतर व्यवस्थांसाठी तब्बल ५ लाख रुपयांच्या अनुदानाचा खर्च या कार्यक्रमासाठी करण्यात आला आहे. या ठिकाणी ३३ बचत गटांचे एकूण २१ स्टॉल्स उभारण्यात आले होते.

या प्रदर्शनात शासकीय योजनांची माहिती देण्यासाठी कृषी विभाग आणि पशुसंवर्धन विभागाचे स्टॉल्स लावण्यात आले होते. मात्र, त्या ठिकाणी संबंधित विभागाचे अधिकारी अथवा योजनांची माहिती सांगणारे कर्मचारी उपस्थित नसल्याने हे स्टॉल केवळ नाममात्र आणि शोभेची वस्तू बनून राहिले आहेत.





दरम्यान, मुळात हा कार्यक्रम एका दिवसाचा होता, मात्र तो दोन दिवस ठेवण्यात आला असल्याची माहिती वडवणी तालुक्याचे गटविकास अधिकारी अशोक बाराखोते यांनी दिली. लाखो रुपयांचा निधी खर्च होऊनही 'उमेद'च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उदासीनतेमुळे आणि नियोजनाच्या अभावामुळे बचत गटांच्या मालाला ग्राहकच न मिळाल्याने महिलांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वडवणी तहसीलचे व्हिडिओ आणि प्रदर्शन नियोजन अधिकारी राख यांनी माहिती देताना सांगितली काल जवळपास बचत गटाची सत्तर हजार रुपयांची विक्री झाली आहे आज एक लाखापर्यंत जाण्याची शक्यता आहे त्यांनी व्यक्त केली एक दिवसाचे प्रदर्शन आपण दोन दिवस घेतल्याचे देखील त्यांनी सांगितले यासाठी वेगळी काही नियोजन नाही फक्त बचत गटांच्या मालांना वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी हा यामागचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

तगारा येथील गोशाळेतील गाईंनवर दुष्काळाचे सावट दानशुरांनी चारा, पाणी देऊन गोमातेचे आशिर्वाद घ्यावेत

अंमळनेर । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील तगारा येथे श्री. बहुउद्देशीय सेवाभावी संस्था उंबरविहीरा संचलीत राधाई गोशाळा गेल्या अनेक वर्षापासून राबवली जात असुन १४० गाईंचे पालनपोषण केले जात आहे. मात्र बीड जिल्ह्यात दुष्काळाने या गोशाळेवर चारा आणी पाण्याचे भिषण सावट निर्माण झाले असुन तीन चार दिवस पुरेल एवढाच चारा शिल्लक राहिल्याने दानशुरांनी येथील गाईंना चारा उपलब्ध करुन मानवता जपावी आणी गोमातेचे आशिर्वादामुळे घ्यावेत असे अवाहन गोशाळा चालक ह. भ. प. नामदेव हरिभाऊ जगदाळे यांनी केले आहे.

राज्यात दुष्काळ जाहीर झाला असला तरी शेतकरी आणी गोशाळांमधील पशुधनाची स्थिती विदारक बनली आहे.



पावसाअभावी शेतात चारा, कडबा, उपलब्ध नसुन डोंगरातील चाराही सुकुन गेला आहे. शासन गोशाळेला अल्प अनुदान देत असुन तेवढ्या अनुदानात जनावरांचे भुक भागवली जात नाही त्यामुळे अनुदान देखील वाढवावे आणी जे काही दानशूर असतील त्यांनी चारा, पाणी देण्याची अवश्यकता भासवु लागली आहे.

तगारा येथील डोंगराच्या कुशीत दिड एक्कर जागेत वसलेल्या राधाई गोशाळेत गाईसोबतच बैल व ईतर जनावरे देखील जोपासली जात आहेत. तर पशुधनाला चारा देणे शक्य नसल्याने काही शेतकरी नाईलाजाने जनावरांची विक्री करत आहेत परंतु शेतकरी खरेदीदार नसल्याने जनावरे कत्तलीसाठी देखील जाण्याची भिती व्यक्त होत आहे.तर काही शेतकरी चारा नसल्याने आपली जनावरे गोशाळेत सोडत आहेत. भविष्यात देखील गोशाळेत जनावरे वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुष्काळाची दाहकता पाहता ज्यांना गोशाळेसाठी, ओला चारा, कडबा, पेंड, खुराक देण्याची ईच्छा असेल अशांनी ह. भ. प. नामदेव जगदाळे तगारा मोबाईल क्रमांक ९५२७८१०३८८ यावर संपर्क साधावा असे अवाहन करण्यात आले आहे.

पान ६ वरुन...

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या

शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मनोज शिंदे म्हणाले की, बीड जिल्ह्यातील हजारो ऊसतोड कामगार दरवर्षी रोजगारासाठी आपल्या घरदारापासून दूर जातात. ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता रात्रंदिवस कष्ट करून ते साखर उद्योगाची चाके गतिमान ठेवतात. मात्र, त्यांच्या वाट्याला अनेकदा आर्थिक अडचणी आणि संघर्षच येतो. दिवाळीसारख्या आनंदाच्या सणातही अनेक कुटुंबांना मूलभूत गरजांची चिंता सतावत असते. या कष्टकऱ्यांच्या घरातही सणाचा आनंद फुलावा, त्यांच्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर समाधान उमटावे, या भावनेतून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. शिवसेना ही केवळ राजकारण करणारी संघटना नसून सर्वसामान्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे कुटुंब आहे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी ऊसतोड कामगारांच्या हितासाठी शिवसेना सदैव कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. जिल्ह्यातील एकही गरजू ऊसतोड कामगार दिवाळीच्या आनंदापासून वंचित राहू नये, यासाठी प्रत्येक ऊसतोड कामगाराच्या घरापर्यंत शिधा पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांसाठी शिवसेना यापुढेही ठामपणे त्यांच्या पाठीशी उभी राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला शिवसेना लोकसभा संपर्कप्रमुख मनोज शिंदे, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, परमेश्वर कराड, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले, युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, शेतकरीसेना जिल्हाप्रमुख बापूसाहेब जाधव, श्रमिक कामगार सेना जिल्हाप्रमुख मनेश भोसकर, अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख सरफराज काझी, बीड विधानसभा प्रमुख सुनील अनभुले, माजलगाव विधानसभा प्रमुख रामदास ढगे, जिल्हा संघटक योगेश नवले, दीपक काळे, उपजिल्हाप्रमुख संदीप माने वडवणी तालुकाप्रमुख माऊली गोंडे, युवा सेना तालुकाप्रमुख माजलगाव अभिजीत कोंबडे, उपजिल्हाप्रमुख नितीन मुंदडा, अमोल जाधव, माजलगाव तालुकाप्रमुख तुकाराम येवले, वडवणी तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर गोंडे, धारूर तालुकाप्रमुख नारायण कुरुंद, राम जगताप, प्रदीप माने, प्रदीप जोगदंड, अमोल कांबळे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि मोठ्या संख्येने ऊसतोड कामगार उपस्थित होते. कष्टकऱ्यांच्या घामाचा सन्मान, त्यांच्या घरात आनंदाचा दिवा आणि त्यांच्या मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा हा उपक्रम म्हणजे शिवसेनेच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन ठरला.

पिंपळगाव घाट ते चाकरवाडी

५० पुरुष व महिला भक्तगण या सोहळ्यात सामील असतात सदर दिंडी सोहळा हा चौसाळा येताच दर एकादशी प्रमाणे गावातील नरहरी पंत काशीद यांनी दिनांक ५ ११ २०२६ एकादशी दिवशी आगमन होताच त्यांच्या फराळाचा व्यवस्था केली तर सोहळ्यातील भाविक भक्तांना स्थानिक चे पत्रकार एनटी वाघमारे विकास सर्वज्ञ ज्ञानेश्वर नवशेकर आदी नागरिकांनी भक्ताचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या

आष्टी पंचायत समिती कर्मचारी

व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याचे अधिकृतरीत्या जाहीर केले. या निवडीमुळे पतसंस्थेच्या कारभाराला नवे नेतृत्व मिळाले असून कर्मचारी सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून कर्मचारी सभासदांच्या आर्थिक गरजा, अडचणी आणि भविष्यातील सुरक्षिततेचा आधार असते. त्यामुळे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांसमोर सभासदांचा विश्वास अधिक दृढ करण्याबरोबरच संस्थेचा कारभार पारदर्शक, विश्वासार्ह आणि गतिमान करण्याचे महत्त्वपूर्ण आव्हान असणार आहे.

नवनिर्वाचित चेअरमन रोहित सायंकड आणि व्हाईस चेअरमन बाबूराव आंधळे यांच्या नेतृत्वाखाली पतसंस्थेची आर्थिक प्रगती, सभासदांचे हित आणि संस्थेचा सर्वांगीण विकास साधला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निवडीनंतर नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे संचालक मंडळ, सभासद आणि कर्मचारी वर्गाकडून अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सहकार क्षेत्रातील या नव्या नेतृत्वाला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

२२० कोटींच्या रस्त्याला

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष रस्त्याची पाहणी करावी. ज्या ठिकाणी चिरा व खड्डे पडले आहेत, त्या ठिकाणांची तांत्रिक तपासणी करून योग्य पद्धतीने दुरुस्ती करून घ्यावी. तसेच काँक्रीटची गुणवत्ता, जाडी आणि बांधकामाचे तांत्रिक निकष पूर्ण झाले आहेत की नाहीत, याची तपासणी करावी. रस्ता पूर्ण होण्याआधीच जर चिरा आणि खड्डे पडत असतील, तर भविष्यात या रस्त्याची अवस्था काय होणार? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित विभागाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन गुणवत्तापूर्ण कामाची खात्री करावी. अन्यथा रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात वरिष्ठ कार्यालय, सार्वजनिक बांधकाम मंत्री आणि मुख्यमंत्री यांच्याकडे ऑनलाइन तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशाराही देण्यात येत आहे.

महासांगवी ग्रामपंचायत १५ व्या

काढण्यात आली आहेत का, याची सखोल चौकशी करण्यात यावी. चौकशीदरम्यान निधीचा गैरवापर, खोटी/बोगस बिले किंवा इतर आर्थिक अनियमितता आढळल्यास संबंधित सरपंच, ग्रामसेवक व इतर जबाबदार व्यक्तींची जबाबदारी निश्चित करून नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी. शासनाच्या निधीचा गैरवापर झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित रकमेची वसूली करून आवश्यक ती प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

झालेल्या चौकशीचा अहवाल व करण्यात आलेल्या कारवाईची माहिती लेखी स्वरूपात देण्यात यावी.

आबा गर्जे यांनी दिलेल्या निवेदनामध्ये (दिनांक: ४/११/२०२६ रोजी) नमूद केले आहे की, या अर्जाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद, बीड) यांच्यासह गटविकास अधिकारी (पंचायत समिती, पाटोदा) आणि तहसीलदार (पाटोदा) यांना पाठवण्यात आली असून, यावर प्रशासनाकडून काय कारवाई केली जाते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

पाटोद्याच्या तालुका कृषी कार्यालयाचेच झाले 'गोडाऊन'

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या पाटोद्यातील तालुका कृषी कार्यालयाचा भोंगळ कारभार चव्हाटचावर आला आहे. कार्यालयासाठी स्वतंत्र गोडाऊन उपलब्ध नसल्यामुळे थेट भाड्याच्या इमारतीतील कृषी कार्यालयातच बियाण्यांचे साठे ठेवावे लागत आहेत, ज्यामुळे कार्यालयाचे गोडाऊनमध्ये रूपांतर झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

कार्यालयाला नेहमी पडदे, कर्मचारी वेळेवर नाहीत

पाटोदा कृषी कार्यालय नेहमी पडद्यांनी झाकलेला असतो. येथे कामासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी कर्मचाऱ्यांच्या येण्या-जाण्याच्या वेळांचा काहीही नियम राहिलेला नाही. अधिकारी कधी येतात आणि कधी जातात, याचा ताळमेळच उरलेला नाही. परिणामी, दूरवरच्या गावांमधून हक्काच्या कामासाठी व योजनांच्या लाभासाठी येणारे शेतकरी अधिकारी-कर्मचाऱ्यांअभावी दररोज रिकाम्या हाताने परत जात आहेत.

दुष्काळातही अधिकारी मुख्यालयात गैरहजर

सध्या तालुक्यात अत्यंत बिकट व दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा गंभीर परिस्थितीत जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व शासकीय अधिकाऱ्यांना आपल्या मुख्यालयात अनिवार्यपणे उपस्थित राहण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. मात्र, पाटोदा कृषी अधिकारी नेहमी मीटिंगचे कारण पुढे करून मुख्यालयातून व कार्यालयातून गैरहजर राहत असल्याचा गंभीर आरोप संतप्त शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

फळबाग योजना केवळ कागदावरच; शेतकऱ्यांना वाली कोण?

लकी ड्रॉ आणि विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना फळबागा मंजूर झाल्या आहेत. मात्र, आजवर या फळबागांना ना पाणी मिळाले ना शासनाचे कोणते अनुदान! त्यामुळे तालुक्यातील या महत्त्वाच्या योजना केवळ कागदावरच राहिल्याचे दिसत आहे. तालुक्यात खरोखरच शेतकऱ्यांना वाली कोण? असा उद्विग्न सवाल आता बळीराजाकडून विचारला जात आहे.

सध्याच्या या भीषण दुष्काळी परिस्थितीत प्रशासनाचा हा कारभार असाच सुरू राहिल्यास, या संपूर्ण अनागोंदीवर आता जिल्हाधिकारी नेमकी काय कारवाई करणार, याकडे संपूर्ण पाटोदा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

तालुका कृषी अधिकारी शेळके यांची प्रतिक्रिया:

अपघातामुळे मी सुट्टीवर होतो, त्या कालावधीत आंधळे यांच्याकडे पदभार होता. अपघात बरा झाल्यानंतर आज, ४ नोव्हेंबर रोजी मी पुन्हा तालुका कृषी अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. सध्या कृषी कार्यालय भाड्याच्या इमारतीत सुरू असून स्वतंत्र गोडाऊनची सोय उपलब्ध नाही, त्यामुळे नाईलाजाने कार्यालयाच्या जागेतच बियाणे ठेवावे लागले आहे. शासनाकडून नवीन प्रशासकीय इमारत उपलब्ध झाल्यानंतर स्वतंत्र गोडाऊनची व्यवस्था होईल.

- शेळके (तालुका कृषी अधिकारी, पाटोदा)

डॉ. वर्षा माने यांच्या संकल्पनेतून गेवराईत सुरांची दीपावली

गेवराई । प्रतिनिधी

महिला डॉक्टर्स असोसिएशन, गेवराई यांच्या वतीने 'स्वरमयी धनत्रयोदशी दिवाळी पहाट २०२६' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ. वर्षा धनंजय माने, उपाध्यक्ष डॉक्टर रेणुका सानप, कोषाध्यक्ष डॉ.अमरजा चेतन पवार, कल्चरल सेक्रेटरी (सांस्कृतिक सचिव) डॉ. रचना मोटे, स्पोर्ट्स सेक्रेटरी(क्रीडा सचिव) डॉक्टर लता आतकरे व सर्व सन्माननीय सदस्य यांनी नियोजन केले आहे.यांच्या पुढाकारातून होणारा हा उपक्रम गेवराईच्या सांस्कृतिक क्षेत्रात विशेष आकर्षण ठरत आहे. शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे ५ वाजता माने हॉस्पिटल, गेवराई येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

आग लागल्यास काय करावे, आदित्य कॅम्पसच्या ४५० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

अग्निशमन विभागाकडून महाविद्यालयात मॉक ड्रिल, अग्निसुरक्षा जनजागृती

बीड । प्रतिनिधी

आग लागण्याच्या दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक खबरदारी, अग्निसुरक्षा उपकरणांचा योग्य वापर आणि आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षितपणे बाहेर पडण्याच्या पद्धतींबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आदित्य इंजिनिअरिंग कॉलेज, बीड येथे अग्निसुरक्षा जनजागृती कार्यक्रम व प्रात्यक्षिक सराव (मॉक ड्रिल) आयोजित करण्यात आले होते. अग्निशमन विभागाच्या वतीने ४५० विद्यार्थ्यांना मॉक ड्रिलच्या माध्यमातून अग्निसुक्षेसंदर्भात प्रत्यक्ष धडे देण्यात आले.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध सामाजिक, शैक्षणीक उपक्रम राबवले जात आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बीड नगर परिषदेचे अग्निशमन अधिकारी किशोर जाधव उपस्थित होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नीलेश बहादूरे, डॉ. राहुल खडके,डॉ. कृष्णा पंत यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. नीलेश बहादूरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. नीलेश बहादूरे यांनी केले. ते म्हणाले, आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती असणे, अग्निशमन उपकरणांचा योग्य वापर करता येणे आणि



आपत्कालीन परिस्थितीत प्रसंगावधान राखून स्वतःसह इतरांचे प्राण वाचविण्याची क्षमता विकसित होणे आवश्यक आहे.केवळ सैद्धांतिक माहिती न घेता प्रत्यक्ष मॉक ड्रिलच्या माध्यमातून आपत्कालीन परिस्थितीचा अनुभव घेणे हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे.सुरक्षितता ही केवळ जबाबदारी नसून ती प्रत्येकाची सवय बनली पाहिजे, किशोर जाधव म्हणाले, विद्युत उपकरणांचा असुरक्षित वापर, विद्युत यंत्रणांवरील अतिभार, खराब वायर आणि सदोष सॉकेट यांसारख्या कारणांमुळे आग लागण्याची शक्यता वाढते. आग लागल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा आग लागू नये यासाठी आवश्यक खबरदारी घेणे अधिक महत्त्वाचे आहे. महाविद्यालयातील अग्निशामक यंत्रांचे स्थान, त्यांचा योग्य वापर, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग आणि सुरक्षित स्थलांतराच्या पद्धती यांची माहिती प्रत्येक विद्यार्थ्याला असणे आवश्यक आहे. आग लागल्यास घाबरून न जाता इतरांना सावध करावे, सुरक्षित मार्गाने बाहेर पडावे आणि अग्निशमन विभागाच्या १०१ किंवा आपत्कालीन हेल्पलाइन ११२ या क्रमांकांवर संपर्क साधावा. आग लागलेल्या इमारतीत लिफ्टचा वापर न करता जिन्याचा वापर करावा आणि धूर पसरल्यास शक्य असल्यास जमिनीच्या जवळ राहून सुरक्षित बाहेर पडावे. अग्निसुरक्षा ही केवळ अग्निशमन विभागाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येकाने वेळीच खबरदारी घेतल्यास मोठ्या दुर्घटना टाळता येऊ शकतात आणि अनेकांचे प्राण वाचवता येवू शकतात, असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. शिवानंद माळी, प्रा. अमित भेलोंडे, प्रा. एल. बी. राऊत, प्रा. व्ही.व्ही. देशमुख, प्रा. वाघमारे आदी उपस्थित होते. आभार प्रा. ऋषिकेश खडके मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. अमित भेलोंडे आणि प्रा. ऋषिकेश खडके यांनी विशेष परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांना मॉक ड्रिल प्रात्यक्षिक

अग्निशामक यंत्रांचा प्रत्यक्ष वापर, आग लागल्यास त्वरित करावयाच्या उपाययोजना, आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षित स्थलांतर आणि बचावकार्याच्या प्राथमिक पद्धतींची माहिती विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष जाणून घेतली. मॉक ड्रिलच्या माध्यमातून आपत्कालीन परिस्थितीत शांतता राखणे, योग्य निर्णय घेणे आणि सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करणे किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली.

ऊसदराचा तोडगा न निघाल्यास मुंबईचा भाजीपाला, दूध रोखणार

राजू शेट्टींचा कारखानदारांना इशारा

पुणे / प्रतिनिधी

ऊसाला प्रतिटन ४ हजार ५०० रुपये पहिली उचल आणि अंतिम दरात ५०० रुपयांची वाढ मिळावी, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील किणी टोलनाक्यावर बेमुदत चक्काजाम आंदोलन केले. हजारो यावेळी शेतकऱ्यांनी टोलनाका बंद पाडत महामार्गावर ठिय्या मांडला.

गेल्या २३ तासांहून अधिक काळ महामार्ग रोखून धरल्यानंतरही ऊसदराचा प्रश्न मार्गी न लागल्याने राजू शेट्टी यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. ऊसदरावर तोडगा न निघाल्यास मुंबईकडे जाणारी भाजीपाला आणि दूध वाहतूक रोखण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. 'आमची दिवाळी होऊ दिली नाही, तर तुमचीही दिवाळी होऊ देणार नाही,' असा इशारा राजू शेट्टी यांनी साखर कारखानदारांना दिला. कारखानदारांना निर्णय घेण्यासाठी ऊसदराचा प्रश्न सोडवावा. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे ऊसदराचा तिढा आणखी



चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ऊसदराच्या मागणीसाठी सुरू असलेल्या या आंदोलनामुळे पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळित झाली. सातारा, उंब्रज, किणी आणि वाठार या ठिकाणी आंदोलकांनी महामार्गावर ठिय्या दिल्याने वाहतुकीची कोंडी झाली हजारो शेतकरी रस्त्यावर उतरल्याने महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील नागठाणे (ता. सातारा) येथे तीव्र चक्काजाम आंदोलन सुरू करण्यात आले. माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. दरम्यान, पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतही ऊसदराच्या प्रश्नावर कोणताही तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. साखरेला प्रतिक्विंटल ४ हजार ७०० ते ५ हजार ६०० रुपये दर मिळत असताना ऊस उत्पादकांना प्रतिटन ४ हजार ५०० रुपये पहिली उचल देण्यास कारखानदार टाळाटाळ का करत आहेत, असा सवाल संघटनेने उपस्थित केला आहे. पहिली उचल निश्चित झाल्याशिवाय ऊसतोडणी होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका संघटनेने घेतली आहे. किणी, घुणकी, चावरे, तळसंदे, पारगाव आणि वाठार परिसरातील शेतकऱ्यांनी आंदोलनस्थळी सहभागी झालेल्या शेतकऱ्यांसाठी भोजनाची व्यवस्था केली. तसेच पेठवडगाव परिसरातील महिलांनी राजू शेट्टी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांसाठी भाकरी आणून दिल्या.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८६० : अब्राहम लिंकन अमेरिकेचे १६ वे अध्यक्ष म्हणून निवडून आले.
१८८८ : महात्मा गांधींनी कायद्याच्या अभ्यासासाठी लंडन येथे प्रवेश घेतला.
१९१२ : भारत या पत्राचा पहिला अंक प्रसिद्ध झाला.
१९१३ : दक्षिण आफ्रिकेत भारतीय वंशाच्या खाणकामगारांच्या मोर्चाचे नेतृत्त्व केल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.
१९५४ : मुंबई राज्यात मुंबई वीज मंडळ या दिवशी स्थापन करण्यात आले.
१९९६ : अर्जेंटिनाचे गांधी म्हणून ओळखले जाणारे प्रा. अडोल्फो डी. ओबिएता यांना पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या हस्ते जमनालाल बजाज आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान.
१९९९ : विकसनशील देशांना जैवतंत्रज्ञानाचा लाभ उपलब्ध करुन दिल्याबद्दल भारताचे वैज्ञानिक डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांना युनेस्को गांधी सुवर्णपदक जाहीर.
२००१ : संरक्षण संशोधन व विकास संस्थेचे महासंचालक डॉ. वासुदेव अत्रे यांना प्रतिष्ठेचा वाय. नायडुम्मा स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला.
२०१२ : बराक ओबामा आणि जो बिडेन यांची दुसर्यांदा अनुक्रमे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि उपराष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१४ : सॅक्सोफोन या वाद्याचे जनक ॲडोल्फ सॅक्स यांचा जन्म. (मृत्यू: ४ फेब्रुवारी १८९४)
१८३९ : प्राच्यविद्या संशोधक, पहिले भारतीय पुरतत्त्वज्ञ भगवादास इंद्रजी यांचा जन्म.
१८६१ : बास्केटबॉल खेळाचे निर्माते जेम्स नास्मिथ यांचा जन्म. (मृत्यू: २८ नोव्हेंबर १९३९)
१८८० : निसान मोटर कंपनीचे संस्थापक योशूसुका अकावा यांचा जन्म. (मृत्यू: १३ फेब्रुवारी १९६७)
१८९० : कविभूषण बळवंत गणेश खापर्डे यांचा जन्म.
१९०१ : जेष्ठ टीकाकार, समीक्षक विचारवंत श्री. के. क्षीरसागर यांचा जन्म. (मृत्यू: २९ एप्रिल १९८०)
१९१५ : चित्रपट कथाकार, दिगदर्शक दिनकर द. पाटील यांचा जन्म. (मृत्यू: २१ मार्च २००५)
१९२६ : पत्रकार,कथाकार,कादंबरीकार प्रभाकर नारायण पाध्ये उर्फ भाऊ पाध्ये यांचा मुंबई येथे जन्म.
१९२६ : अमेरिकन लेखक झिग झॅगलर यांचा जन्म. (मृत्यू: २८ नोव्हेंबर २०१२)
१९६८ : याहू चे संस्थापक यारी यांग यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७६१ : मराठेशाहीतील प्रसिद्ध राजकारणी (मराठा साम्राज्यातील ४ थी छत्रपती) महाराणी ताराबाई भोसले यांचे निधन.
१८३६ : फ्रान्सचा राजा चार्ल्स (दहावा) यांचे निधन. (जन्म: ९ ऑक्टोबर १७५७)
१९८५ : प्रसिद्ध अभिनेते संजीवकुमार यांचे निधन. (जन्म: ९ जुलै १९३८)
१९८७ : मराठी रंगभूमीवरील अभिनेते,दिग्दर्शक, लेखक आणि पीडीए (प्रोग्रेसिव डूॅमॅटिक असोसिएशन) चे संस्थापक प्रा.भालबा केळकर यांचे पुणे इथे निधन. (जन्म: २३ सप्टेंबर १९२०)
१९९२ : संगीत रंगभूमीवरील गायक,अभिनेते जयराम शिलेदार यांचे पुणे इथे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १९१६)
१९९८ : कॉन्टिनेन्टल प्रकाशन चे संस्थापक अनंतराव कुलकर्णी यांचे निधन. (जन्म: १९ सप्टेंबर १९१७)
२००२ : स्वत:च्या सुवाच्च अक्षरात हिंदीत राज्यघटना लिहिणारे वसंत कृष्ण वैद्य यांचे निधन.
२०१० : पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सिद्धार्थ शंकर रे यांचे निधन. (जन्म: २० ऑक्टोबर १९२०)
२०१३ : भारतीय शेफ तरला दलाल यांचे निधन. (जन्म: ४ जुन १९३६)

पालकाच्या योग्य जाती पिकवल्यास मिळेल भरघोस नफा

शेतकरी चांगला नफा मिळविण्यासाठी पालकाची लागवड करू शकतात. पालकाचे बरेच प्रकार आहेत. भारतात पालकाची लागवड रब्बी, खरीप आणि उन्हाळी या तीनही पीक हंगामामध्ये केली जाते. यासाठी शेतात पाण्याचा निचरा करण्याची चांगली व्यवस्था असावी. तसेच हलक्या चिकणमाती जमिनीत पालकाच्या पानांचे चांगले उत्पादन मिळते.

या गोष्टींकडे विशेष लक्ष द्या : पेरणीपूर्वी बियाण्यास २ ग्रॅम कॅप्टन प्रति किलोग्रॅमची प्रक्रिया करावी, जेणेकरून उत्पादन चांगले मिळेल. पेरणीसाठी ओळीपासून ओळीपर्यंत २५-३० सेंमी आणि रोपापासून रोपापर्यंत ७-१० सेमी अंतर ठेवावे. पालक लागवडीसाठी, हवामान आणि मातीनुसार जास्त उत्पादन देणारे सुधारित वाण निवडू शकतात.

देशी पालक : देशी पालक बाजारात चांगल्या दराने विकला जातो. देशी पालकाची पाने लहान, गुळगुळीत आणि अंडाकृती असतात. ते खूप लवकर तयार



होते, म्हणून बहुतांश शेतकरी त्याची लागवड करतात.

विलायती पालक : परदेशी पालकाच्या बिया गोल आणि काटेरी असतात. डोंगराळ आणि थंड ठिकाणी काटेरी बियाणे वाढवणे अधिक फायदेशीर आहे. मैदानी भागातही गोल जातींची लागवड केली जाते.

ऑल ग्रीन : हिरव्या पालेभाज्या पालकाची जात १५ ते २० दिवसांत तयार होते. एकदा पेरणी केल्यानंतर ते सहा ते सात वेळा पाने कापू शकते. ही वाण निःसंशयपणे जास्त उत्पादन देते, परंतु हिवाळ्यात लागवड केल्यास ७० दिवसांत बियाणे आणि पाने तयार होतात.पुसा हरित : वर्षभराचा खप भागवण्यासाठी अनेक शेतकरी पुसा हरितची लागवड करतात. त्याची वाढ सरळ वरच्या बाजूस असते आणि त्याची पाने गडद हिरवी आणि आकाराने मोठी असतात. क्षारयुक्त जमिनीवर त्याची लागवड करण्याचे अनेक फायदे आहेत.


पावसाळा संपताच फळबागांना करुन घ्या काव पेस्ट

यंदा भरपूर पाऊस झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत. ज्यांच्या फळबागा आहेत त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. आता पाऊस उघडला असला तरी फळबागेतील झाडांना खोड कीड, वाळवी लागू नये म्हणून खबरदारी घेणे गरजेचे आहे. काव पेस्ट यासाठी महत्वाची असून, ती कधी लावावी तसेच बाजरात कोणकोणत्या काव पेस्ट उपलब्ध आहेत याबाबत माहिती असणे गरजेचे आहे.

काव पेस्ट म्हणजे काय? : झाडाच्या खोडाला कीड किंवा वाळवी लागू नये तसेच तीव्र उन्हापासून खोडाचे रक्षण व्हावे म्हणून खोडाला एक पेस्ट लावली जाते. तांबड्या किंवा पांढऱ्या रंगाच्या या पेस्टलाच काव पेस्ट असे म्हणतात. अलीकडे बाजारात तयार काव पेस्ट सुद्धा उपलब्ध आहे.

काव पेस्ट कशी बनवतात? : अनेकदा पैशांची बचत करण्यासाठी शेतकरी घरच्या घरी काव पेस्ट बनवतात. काव पेस्ट बनवण्यासाठी खालील साहित्य वापरतात. एका बादलीमध्ये किंवा हौदात हे साहित्य टाकून ते २४ तास भिजत ठेवावे लागते. यानंतर पेस्ट झाडांना ब्रशच्या साहाय्याने लावली जाते.

साहित्य : वीस किलो खडा काऊ. २०० ग्रॅम खडा हिंग. दोनशे ग्रॅम कापूर. दोनशे ग्रॅम डांबर गोळी. हे सगळे २४ तास भिजत घाला व त्यानंतर २०० एम एल हमला औषध याच्यामध्ये मिक्स करून झाडांना ब्रेस्टच्या साह्याने पेस्टिंग करून घ्यावी. काव पेस्टचे प्रकार : काव पेस्ट घरात बनवता येतेच पण बाजारात तयार काव पेस्टसुद्धा मिळते. काव पेस्टचे तीन प्रकार आहेत. घरी बनवलेली काव पेस्ट, तयार काव पेस्ट, स्प्रे काव पेस्ट. तुमची झाडे मोठी असतील तर स्प्रे काव पेस्ट वापरल्याने वेळेची बचत होते.



काव पेस्ट लावण्याचे फायदे : फळबागेसह सर्वच मोठ्या झाडांना काव पेस्ट लावण्याचे खूप फायदे आहेत. अनेकदा खोडकीड, वाळवी यामुळे झाडांचे फार नुकसान होते. त्यामुळे वेळीच उपाययोजना केल्या तर होणारे नुकसान टाळता येऊ शकते. काव पेस्ट लावल्याने तीव्र उन्हामध्ये झाडाचे उन्हापासून बचाव होतो.

काव पेस्ट केव्हा लावावी? : काव पेस्ट पावसाळा संपला कि लगेच लावावी. तसेच दर वर्षी फेब्रुवारी महिन्यात काव पेस्ट लावावी. एका वर्षात किमान दोन वेळा काव पेस्ट लावणे गरजेचे आहे. जमिनीपासून साधारणपणे ३ फूट उंचीपर्यंत खोडाला ब्रशच्या साहाय्याने पेस्ट लावावी. तसेच जिथे नवीन फांद्या फुटल्यात अशा ठिकाणी काही अंतरापर्यंत पेस्टींग करावे.

रब्बी पिकांच्या व्यवस्थापनाबाबत मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी तज्ज्ञांचा सल्ला

रब्बी हंगामाची लागवड आता लवकरच सुरु होत आहे. तर काही पिकात आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. अगोदर लागवड झालेल्या काही पिकांवर किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सध्याच्या परिस्थितीत विविध पिकांचे नियोजन कसे करावे यासाठी कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांनी खास मराठवाड्याच्या शेतकऱ्यांसाठी कृषी सल्ला दिला आहे.

रबी पिकांसाठी कृषी तज्ज्ञांच्या शिफारशी : ऊस लागवड - पूर्व हंगामी उसाची लागवड लवकरात लवकर संपवावी. ऊस लागवड करतांना ३० किलो नत्र, ८५ किलो स्फुरद व ८५ किलो पालाश (३२७ किलो १०:२६:२६ किंवा १८५ किलो डायअमोनियम फॉस्फेट + १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश किंवा ६५ किलो युरिया + ५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट + १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी खतमात्रा द्यावी. ऊस पिकावर खोड किडीचा ०प्रादुर्भाव दिसून येत असल्यास व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० % २५ मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल १८.५% ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ऊस पिकावर पांढऱ्या माशीसाठी डायमिथोएट ३० % ३६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

हळद - हळद पिकात कंदमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% २० मिली किंवा डायमिथोएट ३० % १५ मिली प्रति



१० लिटर पाण्यात मिसळून आलटून-पालटून फवारणी करावी. (हळद पिकावर केंद्रीय किटकनाशक मंडळातर्फे लेबल क्लेम नसल्यामूळे विद्यापिठ शिफारशीत संशोधनाचे निष्कर्ष दिले आहेत). हळदीचे उघडे पडलेल कंद मातीने झाकून घ्यावेत. हळद पिकात आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. हळदीच्या पानावरील ठिपके / करपा रोग याच्या व्यवस्थापनासाठी अझोक्सिस्ट्रॉबिन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४% (पुर्वमिश्रित बुरशीनाशक) १० मिली + ५ मिली स्टीकरसह प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

हरभरा, करडई, ज्वारी - जोमदार वाढीसाठी हरभरा पीक सुरुवातीपासूनच तण विरहीत ठेवणे आवश्यक आहे. पीक २० ते २५ दिवसाचे असतांना पहिली कोळपणी करावी. मागील काही दिवसात किमान तापमानात झालेल्या घटीमूळे, वेळेवर लागवड केलेल्या करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३०% १३ मिली किंवा असिफेट ७५% १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. करडई पिकात तणांच्या व्यवस्थापनासाठी पेरणीनंतर २५ ते ५० दिवसापर्यंत एक ते दोन कोळपण्या व खुरपणी करून घ्यावी. लवकर पेरणी केलेल्या रब्बी ज्वारी पिकात लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील किटकनाशकांची आलटून पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. फवारणी करत असतांना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी.

फळबागेचे व्यवस्थापन : संत्रा/मोसंबी बागेत फळवाढीसाठी ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर तसेच जिब्रॅलिक ॲसिड १ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. संत्रा/मोसंबी बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. डाळींब बागेत फळवाढीसाठी ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. डाळींब व चिकू बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनूसार पाणी द्यावे.

कांदेबाग केळीचे सरासरी उत्पादन घटले



जळगाव : खानदेशात मार्च ते जून या कालावधीत विविध भागांत वादळामुळे कांदेबाग केळी पिकाची मोठी हानी झाली. यात पीक निसवणीवर असतानाही कमी पाऊस होता. याचा फटका पिकास बसला आहे. यामुळे उत्पादन कमी झाले असून कांदेबाग केळीची सरासरी रास १५ किलोपर्यंत जिल्ह्यात दिसत आहे, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

कांदेबाग केळी पिकाची निसवण व अन्य व्यवस्थापन भर उन्हाळ्यात करावे लागते. कारण त्याची लागवड ऑक्टोबर ते डिसेंबरमध्ये होते. आगाप लागवड सप्टेंबरमध्ये असते. उष्णतेचे चार महिने व याच कालावधीमधील वादळ व अन्य समस्यांचा फटका या बागांना बसला आहे. बागांची निसवण व काढणीची प्रक्रिया पावसाळ्यात सुरू होते. परंतु या बागांना यंदा वादळाचा मोठा फटका बसला आहे. एप्रिल व मे महिन्यात जळगाव, चोपडा, यावल या भागांत वादळी पाऊस झाला. यात पिकाचे नुकसान झाले. अनेक बागांची पाने फाटली. यामुळे बागांच्या वाढीवर परिणाम झाला. यात यंदा फेब्रुवारीतच सरासरी तापमान अधिक होते. मार्च व एप्रिलमध्येही तापमान अधिक होते. पुरेसे पाणी देऊनही कांदेबाग केळी होरपळल्याचे प्रकार जामनेर, जळगाव भागांत घडले. बागांची पाने फाटल्याने पिकाची अन्नग्रहण क्षमता पूर्ण खालावली. खानदेशात एप्रिलमध्ये केळी पिकासाठी प्रतिकूल वातारवण राहिले. पण मेमध्ये कमाल तापमान कमी होते. यामुळे काहीसा दिलासा मिळाला. पण पिकात निसवणीला फटका बसला. कमी फण्या व दर्जा यावरही परिणाम झाला. यामुळे कमाल २० ते १८ किलोची रास शेतकरी मिळवू शकले आहेत. काही भागात १० ते १२ किलो उत्पादन राहिले. सरासरी उत्पादन मागील हंगामाच्या तुलनेत दीड ते दोन किलोने कमी झाले आहे.

नागरिकांना विहित मुदतीत गुणवत्तापूर्ण सेवा द्या; प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करा -आयुक्त डॉ. किरण जाधव

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत नागरिकांना विविध शासकीय सेवा पारदर्शकपणे, सुलभतेने आणि निर्धारित कालावधीत उपलब्ध करून देण्यास प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे. नागरिकांना शासकीय कामांसाठी अनावश्यक हेलपाटे मारावे लागू नयेत, तसेच प्रलंबित अर्जांचा नियमित आढावा घेऊन त्यांचा तातडीने निपटारा करावा, असे निर्देश राज्य सेवा हक्क आयोगाच्या छत्रपती संभाजीनगर विभागाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात आज महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्याअंतर्गत देण्यात येणाऱ्या सेवांचा आढावा घेताना डॉ. किरण जाधव बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल,



उपजिल्हाधिकारी सुकेशिनी पगारे, जालना उपविभागीय अधिकारी रामदास दौड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी संबंधित जिल्ह्यांतील महसूल, ग्रामविकास, नगरपालिका तसेच अन्य विभागांच्या अधिकाऱ्यांकडून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती घेण्यात आली. प्राप्त अर्ज, प्रलंबित प्रकरणे, अपिलातील अर्ज आणि ऑनलाइन सेवा प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.शासकीय सेवा मिळविण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी वारंवार जावे लागू नये. शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या गावातच 'आपले सरकार' सेवा केंद्राच्या माध्यमातून सुलभ व दर्जेदार सेवा मिळाली पाहिजे. यासाठी ग्रामपंचायत, महसूल आणि नगरपालिका स्तरावरील सेवा केंद्रे अधिक सक्षमपणे कार्यान्वित करण्याच्या सूचना डॉ. जाधव यांनी दिल्या.

राज्य सेवा हक्क अधिनियमांतर्गत १२१२ सेवा ऑनलाइन उपलब्ध असून, अधिकाधिक सेवांचे डिजिटायझेशन करून नागरिकांना ऑनलाइन अर्ज व आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित अर्जदाराशी संपर्क साधून त्रुटींची पूर्तता करून घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.प्रत्येक विभागाने किमान ९० टक्के सेवा निर्धारित कालावधीत देण्याचे उद्दिष्ट ठेवावे. प्रलंबित अर्जांचा दररोज आढावा घेऊन शक्य तितक्या प्रकरणांचा निपटारा करावा. अपिलात गेलेल्या प्रकरणांमध्ये अर्जदारांशी योग्य संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात. सेवा देण्यात होणारा विलंब टाळण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले.लोकसेवा हक्क कायद्यानुसार सेवा देण्यास विलंब झाल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. मात्र, अशी कारवाई करण्याची वेळ येऊ नये, यासाठी प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने नागरिकांना सेवा देणे हे आपले कर्तव्य समजून काम करावे. प्रशासनाच्या कामकाजात अधिक पारदर्शकता, गतिमानता आणि लोकाभिमुखता आणण्याची गरजही डॉ. जाधव यांनी अधोरेखित केली.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी शासनाच्या विविध विभागांमार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा अधिक पारदर्शक, गतिमान व कालमर्यादेत उपलब्ध होण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. तसेच सेवा वितरण प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, प्रलंबित प्रकरणे आणि त्यावरील उपाययोजनांबाबतही बैठकीत माहिती सादर करण्यात आली.

निवृत्तीवेतनधारकांनी जीवन प्रमाण संकेतस्थळ व मोबाईल ॲपद्वारे सादर करावेत

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व निवृत्तीवेतनधारकांनी दि. १ ते ३० नोव्हेंबर २०२६ दरम्यान आपला हयातीचा दाखला सादर करणे शासनाकडून बंधनकारक करण्यात आले आहे. मुदतीत दाखला सादर न केल्यास डिसेंबर २०२६ पासून निवृत्ती वेतन अदा केले जाणार नाही, तरी बँकांमधील गर्दी टाळण्यासाठी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी शासनाने उपलब्ध करून दिलेल्या जीवन प्रमाण संकेतस्थळ व मोबाईल ॲपचा जास्तीत जास्त वापर करून ऑनलाईन पद्धतीनेच आपले हयातीचे प्रमाणपत्र कोषागारात सादर करावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाब्रस यांनी केले आहे.

निवृत्तीवेतनधारकांना आपला हयातीचा दाखला सादर करण्यासाठी शासनाने प्रत्यक्ष आणि ऑनलाईन अशा दोन्ही प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या डआहेत. निवृत्तीवेतनधारकांनी संबंधित बँकेत प्रत्यक्ष उपस्थित राहून यादीतील आपल्या नावासमोर स्वाक्षरी करावी किंवा अंगठ्याचा ठसा उमटवावा. तसेच चालू मोबाईल क्रमांक, पुनर्विवाह किंवा पुनर्नियुक्ती झाली असल्यास त्याची माहिती नोंदवावी. .. या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन किंवा स्मार्टफोनवर जीवन प्रमाण ॲप्लिकेशन डाउनलोड करून चेहरा किंवा बोटांच्या ठशांद्वारे ऑनलाईन ओळख पटवून दाखला सादर करता येईल. हयातीच्या प्रमाणपत्रावर बँक अधिकारी किंवा कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्याच्या समक्ष स्वाक्षरी घेऊन ते प्रमाणपत्र जिल्हा कोषागार कार्यालयात जमा करता येईल. भारतीय डाक विभागाने डिजिटल हयातीचा दाखला ऑनलाईन सादर करण्याची सशुल्क सुविधा उपलब्ध करून दिली आहे. काही कारणास्तव परदेशात असलेल्या निवृत्तीवेतनधारकांना तेथील भारतीय राजदूतावासाच्या माध्यमातून आपला हयातीचा दाखला संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयाकडे पाठविता येईल. वेळेत दाखला सादर न केल्यास निवृत्तीवेन थांबवले जाईल, याची सर्व लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी. असेही कळविले आहे.

तुळजाभवानी मंदिरात रविवारी अग्नीचा थरार

तुळजापूर

दिपावलीतील प्रमुख आकर्षण धगधगत्या अग्नीचा थरार ''भेंडोळी उत्सव'' रविवार (दि. ०८) रात्री तुळजाभवानी मातेच्या दरबारात रंगणार आहे. तत्पूर्वी नरकचतुर्दशी निमित्त पहाटे तुळजाभवानी मातेला सुगंधी उटणे लावून अभ्यंगस्नान घालण्यात येणार आहे.तुळजाभवानी मातेच्या दरबारात दीपोत्सव - दिपावली पारंपरिक पद्धतीने साजरी करण्याची प्रथा आहे. तुळजाभवानी मंदिरात दिपावली सोबतच गुढीपाडवा, रंगपंचमी, नागपंचमी, बैलपोळा आदी विविध सण हिंदू परंपरेनुसार साजरे करण्यात येत असतात. अश्विन अमावास्येला सायंकाळी तुळजाभवानी मंदिरात अग्नीचा थरार - भेंडोळी उत्सव साजरा करण्यात येतो. तुळजाभवानी मंदिरातील भेंडोळी उत्सवाला निसर्गाशी जोडणारी हजारो वर्षांची परंपरा आहे. अमावस्येला आकाशात चंद्राचा अभाव असतो.

कर्जमुक्तीच्या रकमेचा चौथा हप्ता जमा शेतकऱ्यांना दिलासा

जालना । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ही योजना सुरु केली आहे. या योजनेतंर्गत दि. ०१/०४/२०१९ ते ३१/०३/२०२५ या कालावधीत वितरित झालेल्या व दि. ३०/०९/२०२५ पर्यंत थकित असलेल्या व दि. ३१/०३/२०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पीक कर्ज व पुनर्गठित / फेरपुनर्गठित कर्जास रुपये दोन लाखापर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. या योजनेची अंमलबजावणी ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असुन यासाठी शासनाने महाआयटी यांची नियुक्ती केली आहे. या योजनेसाठी महाआयटी यांनी तयार केलेल्या योजना पोर्टलवर जालना जिल्ह्यातील बँकांनी एकुण १,९९,५२५ थकीत कर्ज खात्यांची माहिती अपलोड केली आहे. महाआयटी यांनी संगणकीय संस्करण करुन आधार प्रमाणिकरण झालेल्या शेतकऱ्यांपैकी ९९.३७१ पात्र लाभार्थ्यांना यापुर्वीच कर्जमुक्तीची रक्कम रु.७५८.२३ कोटी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा करण्यात आली आहे.



आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी सदर योजनेच्या महाआयटी यांनी संगणकीय संस्करण करुन आधार प्रमाणिकरण केलेल्या ३९९८१ पात्र लाभार्थ्यांना कर्जमुक्तीची रक्कम रु.३५३.५२ कोटी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा करण्यात आली आहे. अशो एकुण चार हप्त्यामध्ये आधार प्रमाणिकरण केलेल्या १३९३५२ पात्र लाभार्थ्यांना कर्जमुक्तीची रक्कम रु.१११९.७५ कोटी शेतक-यांच्या कर्जखात्यात जमा करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. जालनाच्या एकूण ८७७९ पात्र लाभार्थ्यांना कर्जमुक्तीची रक्कम रु. २४.२७ कोटी तर इतर राष्ट्रीयीकृत / खाजगी / व्यापारी / ग्रामिण बँकांचे १३०५७३ पात्र लाभार्थ्यांना कर्जमुक्तीची रक्कम रु. १०८७.४८ कोटी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत आतापर्यंत पात्र लाभार्थ्यांच्या चार याद्या प्रसिदृध झालेल्या असून त्यात जालना जिल्ह्यातील एकुण १७४२५७ पात्र शेतकऱ्यांची नावे प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत. त्यापैकी १४६१९० शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण केलेले असून अद्यापही २८०६७ शेतकऱ्यांनी त्यांचे आधार प्रमाणिकरण केलेले नाही. शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण केल्यानंतरच त्यांची कर्जमुक्तीची रक्कम त्यांच्या कर्जखाती जमा होणार आहे. त्यामुळे सदर यादीतील शेतकऱ्यांनी यादीतील त्यांचा विशिष्ट क्रमांक, आधार कार्ड, ॲग्री स्ट्रेक/फार्मर आय डी क्रमांक तसेच बँकेचे पासबुक घेवून नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्रात किवा बँक शाखेत जावून आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे. ज्या शेतकऱ्यांनी ॲग्री स्टैक / फार्मर आयडी ची नोंदणी केलेली नाही त्यांनी लवकरात लवकर ॲग्री स्टैक / फार्मर आयडी ची नोंदणी करावी असे आवाहन श्री विष्णु रोडगे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांनी केले आहे.

दौलताबादच्या घाटातील वणव्यात वनसंपदा खाक

ग्रामस्थांमुळे पाच तासांनंतर आग आटोक्यात

दौलताबाद। प्रतिनिधी

दौलताबाद घाट परिसरातील कालिकामाता मंदिराजवळील डोंगराला बुधवारी दुपारी तीनच्या सुमारास अचानक आग लागली. वाळलेले गवत आणि घाट परिसरात वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यामुळे आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले. डोंगर परिसरात वेगाने पसरलेल्या या वणव्यात मोठ्या प्रमाणात वनसंपदा जळून खाक झाली. हा परिसर माळीवाडा वनक्षेत्र, तसेच गायरान क्षेत्रात येतो.

दुपारच्या वेळी वाऱ्याचा वेग अधिक असल्याने आणि डोंगरावरील गवत व झाडेझुडपे वाळलेली असल्याने आगीने वेगाने



पेट घेतला. वाऱ्याच्या दिशेने आग पसरत गेल्याने वनसंपदा भक्ष्यस्थानी पडली. माहिती मिळताच वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणण्यास अग्निशमन दलाची गाडीही बोलावण्यात आली. वन विभागाचे वनरक्षक बी. एल. फंड, वनपाल मनोज उदार, वनमजूर प्रभाकर हजारे यांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने आग नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केले. ऑक्टोबर महिन्यात या वर्षी पाऊस पडला नाही. सप्टेंबर महिन्यातही पावसाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे डोंगरावरील गवत वाळले आहे. झुडुपांना लागलेली आग वाळलेल्या गवतापर्यंत पोहोचली आणि डोंगरावर पसरली. उन्हाळ्यापूर्वीच घाटामध्ये वणवा भडकला आहे.

शिधापत्रिकांसाठी आर्थिक गैरव्यवहाराच्या तक्रारी

दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्हा पुरवठा विभाग व तहसील कार्यालयातील नवीन शिधापत्रिका तसेच दुरुस्तीची प्रकरणे प्रलंबित ठेवून नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने अपर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ यांना निवेदन देण्यात आले. या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे, तसेच जिल्हा पुरवठा विभाग व तहसील कार्यालयातील संबंधित संगणक ऑपरेटरची तातडीने बदली करण्यात यावी, अशी ठाम मागणी मनसेचे जालना उपशहर अध्यक्ष श्री. बाळू जवाहरलाल जाधव यांनी केली आहे.

नवीन शिधापत्रिका व दुरुस्तीच्या अर्जांसाठी आर्थिक व्यवहाराची मागणी होत असल्याच्या तक्रारी असून, पैसे न दिल्यास अर्ज प्रलंबित ठेवले जात असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. त्यामुळे गरजू लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या शिध्यापासून वंचित राहावे लागत आहे.प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर निलंबनाची कारवाई करावी, सर्व प्रलंबित अर्ज निकाली काढावेत आणि पात्र लाभार्थ्यांना शिधावाटपाचा लाभ मिळवून द्यावा. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

सर्व विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच पर्यावरणाबाबत जागरूकता महत्त्वाची

अहिल्यानगर। प्रतिनिधी

''विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रदूषणमुक्त दिवाळी हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित उपक्रम नसून पर्यावरणाप्रती आपली जबाबदारी ओळखण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः फटाके न फोडण्याचा संकल्प करण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांना आणि परिसरातील नागरिकांनाही पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी प्रेरित करावे. निसर्गाचे रक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मुख्याध्यापक संदीप भोर यांनी केले.

दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि प्रकाशाचा सण. मात्र, या आनंदोत्सवात फटाक्यांमुळे होणारे वायू प्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण टाळून पर्यावरणाचे रक्षण करण्याचा संदेश केडगाव येथील सरस्वती विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांनी दिला. दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर शाळेत 'प्रदूषणमुक्त दिवाळी' हा जनजागृतीपर उपक्रम राबवण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेतली. या प्रसंगी भोर यांनी विद्यार्थ्यांनी प्रदूषण मुक्त दिवाळीचे महत्त्व समजावून सांगितले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना फटाक्यांमुळे निर्माण होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण तसेच मानवी आरोग्य, पशुपक्षी आणि पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. फटाक्यांच्या आवाजामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती तसेच पशुपक्ष्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. त्याचबरोबर फटाक्यांच्या धुरामुळे हवेची गुणवत्ता खालावून आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे सण साजरा करताना इतरांच्या आरोग्याचा आणि निसर्गाचा विचार करणे आवश्यक असल्याचे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता दिवे, पणत्या आणि पर्यावरणपूरक सजावटीच्या माध्यमातून दिवाळी साजरी करण्याचा निर्धार केला. तसेच वृक्षांचे संवर्धन करणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अंगीकार करणे, याबाबतही विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.

अर्जुनभाऊंच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी पंकजाताई 'दर्शना' निवासस्थानी!

स्व. गोपीनाथ मुंडेंच्या आठवणींनी उजाळले बहीण-भावाचे नाते; कौटुंबिक जिव्हाळ्यासोबतच जालन्याच्या दुष्काळी प्रश्नांवरही सविस्तर चर्चा

जालना । प्रतिनिधी

काही नाती रक्ताची नसतात, ती जिव्हाळ्याची, विश्वासाची आणि अनेक वर्षांच्या ऋणानुबंधांची असतात. अशाच एका भावनिक नात्याचा प्रत्यय आज जालन्यात आला. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील दुष्काळ आढावा बैठक संपल्यानंतर जालन्याचे आमदार तथा माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या भाग्यनगर येथील 'दर्शना' निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची आस्थेवाईकपणे विचारपूस केली. पायाला फ्रॅक्चर झाल्यामुळे सध्या उपचार घेत असलेल्या आमदार खोतकर यांची भेट घेत पंकजाताईंनी त्यांच्या प्रकृतीची माहिती जाणून घेतली. ही भेट केवळ औपचारिक सदिच्छा भेट न ठरता, अनेक वर्षांपासून जपलेल्या कौटुंबिक स्नेहबंधांना उजाळा देणारी



ठरली.

लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे हे अर्जुन खोतकर यांना आपला मानसपुत्र मानत असत. त्यांच्या काळापासून निर्माण झालेला हा जिव्हाळा आजही तितक्याच आत्मीयतेने जपला जात आहे. अर्जुन खोतकर हे पंकजाताईंना आपल्या भगिनी मानतात, तर पंकजाताईही त्यांना मोठ्या भावाप्रमाणे मानतात. या बहीण-भावाच्या नात्यातील आपुलकी आणि परस्पर आदर आजच्या भेटीतून पुन्हा एकदा अधोरेखित झाला. या भेटीदरम्यान स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या सहवासातील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. त्यांच्यासोबतचे अनुभव, कौटुंबिक ऋणानुबंध आणि पंकजाताईंसोबतच्या जुन्या आठवणींमुळे भेटीला भावनिक स्वरूप प्राप्त झाले.

विशेष म्हणजे, प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी झालेल्या या भेटीतही आमदार खोतकर यांनी जालना विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थिती आणि विविध विकासविषयक प्रश्नांना प्राधान्य दिले. जालना शहरासह ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची टंचाई, पशुधनासाठी चारा व पाण्याची उपलब्धता, दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कमाफीचा प्रश्न, जलसंधारण व नाला खोलीकरणाची कामे, महावितरणशी संबंधित अडचणी तसेच जिल्हा नियोजन विभागाच्या माध्यमातून आवश्यक विकासकामांना निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात उभयतांमध्ये सकारात्मक व सविस्तर चर्चा झाली. दुष्काळाची तीव्रता कमी करण्यासाठी तातडीच्या उपाययोजनांसोबतच भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मात करण्याच्या दृष्टीने जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याची आवश्यकता या चर्चेत अधोरेखित करण्यात आली. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, सर्वसामान्य नागरिक आणि पशुधन यांना दिलासा देण्यासाठी शासनाच्या संबंधित विभागांमध्ये समन्वय राखून प्रभावी उपाययोजना करण्याबाबतही चर्चा झाली. 'लवकर बरे व्हा आणि पुन्हा त्याच ऊर्जेने जनसेवेत सक्रिय व्हा!' भेटीच्या शेवटी पंकजाताईंनी आमदार अर्जुन खोतकर यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी आणि त्यांनी पूर्वीच्याच उत्साहाने व ऊर्जेने पुन्हा जनसेवेच्या कार्यात सक्रिय व्हावे, अशी सदिच्छा व्यक्त केली. एका बाजूला भगिनीची भावाप्रती असलेली आस्था, तर दुसऱ्या बाजूला प्रकृती अस्वस्थ असतानाही मतदारसंघाच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची आमदार खोतकर यांची तत्परता, हे या भेटीचे विशेष वैशिष्ट्य ठरले. स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या काळापासून जपलेले कौटुंबिक ऋणानुबंध, परस्परांविषयीचा आदर आणि जालन्याच्या विकासासाठी झालेली सकारात्मक चर्चा यामुळे ही भेट राजकीय औपचारिकतेपलीकडील स्नेहबंधांचे दर्शन घडवणारी ठरली. राजकीय जबाबदाऱ्या बदलतात, पदे बदलतात; मात्र जिव्हाळ्याने जपलेली नाती आणि माणुसकीचे बंध कायम राहतात, याचीच प्रचिती या भेटीतून आली. भास्कर आंबेकर, पंडित दादा भुतेकर,ए जे बोराडे अनिरुद्ध खोतकर, अभिमन्यू खोतकर, भाऊसाहेब घुगे, चक्रधर खोतकर सीमाताई खोतकर शुभम टेकाळे, कमलेश खरे, दुर्गेश कठोटीवाले अश्विन आंबेकर यांचे सह खोतकर परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते

दैनिक
राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.०६ नोव्हेंबर २०२६ | ६

जिल्हा रुग्णालयातील रुग्णांच्या आहारात अनियमिततेचा आरोप!

निकृष्ट जेवण, फळांचा अभाव अन् डाएट चार्टमधील नोंदी संशयाच्या भोवऱ्यात, पाच वर्षांच्या बिलांचे विशेष लेखापरीक्षण करण्याची अजय सरवदेंची मागणी

बीड । प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालय, बीड येथे उपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांना पुरविण्यात येणाऱ्या आहार व्यवस्थेत गंभीर अनियमितता होत असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे प्रतिक उर्फ अजय सरवदे यांनी केला आहे. रुग्णांना निकृष्ट दर्जाचे अन्न, अपूर्ण आहार आणि फळांचा नियमित पुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आल्याचा दावा त्यांनी केला असून, या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून मागील पाच वर्षांच्या आहार कंत्राटाचे विशेष लेखापरीक्षण करण्याची मागणी जिल्हा शल्यचिकित्सकांकडे केली आहे.





शासनाच्या नियमानुसार रुग्णांना पौष्टिक, स्वच्छ व निर्धारित प्रमाणात आहार मिळणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात ब्रेडचा निकृष्ट दर्जा, फळांचा अभाव, आहाराचे अपुरे प्रमाण आणि जेवणाच्या पॅकिंग व वितरण पद्धतीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असल्याचे सरवदे यांनी तक्रारीत म्हटले आहे. रुग्णांना दिल्या जाणाऱ्या आहाराचे व्हिडिओ व छायाचित्रे आपल्याकडे उपलब्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

प्रत्येक वार्डमध्ये दैनिक आहार वाटप चार्ट ठेवणे आणि रुग्णांना दिलेल्या आहाराची नोंद करणे अपेक्षित असताना प्रत्यक्ष किती रुग्णांना कोणता आहार दिला जातो, विशेष आहाराच्या नोंदी कशा ठेवल्या जातात आणि कंत्राटदाराची बिले कोणत्या आधारावर मंजूर होतात, याची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. काही परिचारिकांना कंत्राटदाराकडून चहा, पाणी, नाश्ता व जेवण मोफत दिले जात असल्याचा गंभीर आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना दाखविण्यासाठी वेगळ्या दर्जाच्या जेवणाच्या प्लेट तयार केल्या जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणात अकाउंटंट श्री. केदार आणि आहार व्यवस्थेचे नोडल अधिकारी श्री. लक्ष्मीकांत तांदळे यांच्या भूमिकेचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. मागील पाच वर्षांतील कंत्राटदाराची बिले, निविदा प्रक्रिया, वार्डनिहाय डाएट चार्ट, रुग्णसंख्या, स्टॉक रजिस्टर, पुरवठा नोंदी आणि देयक मंजुरी यांची परस्पर तुलना करून विशेष लेखापरीक्षण करावे, अशी मागणी सरवदे यांनी केली आहे.

चौकशी जिल्हा रुग्णालयातील संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांमार्फत न करता जिल्ह्याबाहेरील वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र समिती नेमून करावी. अन्नाचे नमुने अचानक घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करावी आणि अनियमितता अथवा शासकीय निधीचा अपव्यय आढळल्यास संबंधित कंत्राटदार व दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या ऊसतोड कामगारांची दिवाळी एकनाथ शिंदेंनी गोड केली- मनोज शिंदे

माजलगाव, वडवणी, तेलगाव, चौसाळा येथे शिवसेनेच्या वतीने हजारो कामगारांना दिवाळीचा शिधा वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

दुष्काळी परिस्थिती, आर्थिक विवंचना आणि उदरनिर्वाहासाठी गावापासून दूर राहण्याची वेळ आलेल्या ऊसतोड कामगारांच्या आयुष्यात दिवाळीचा गोडवा निर्माण करण्यासाठी शिवसेनेने माणुसकीचा हात पुढे केला आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारातून बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांना दिवाळीनिमित्त शिधा वाटप करण्यात आले. माजलगाव, वडवणी आणि तेलगाव परिसरात हजारो कामगारांपर्यंत दिवाळीचा शिधा पोहोचविण्याचा संकल्प शिवसेनेने केला आहे. एकनाथ शिंदे यांनी कष्टकऱ्यांच्या दुःखाची जाणीव ठेवत त्यांची दिवाळी गोड केली आहे, असे प्रतिपादन शिवसेनेचे बीड लोकसभा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांनी केले.



(दि. २) सोमवारी संध्याकाळी भीमाशंकर शुगर मिल चौसाळा तर (दि. ३ रोजी) मंगळवारी सायंकाळी सुंदर सोळंके साखर कारखाना तेलगाव, जय महेश सहकारी साखर कारखाना माजलगाव, छत्रपती सहकारी साखर कारखाना सावरगाव येथे शिधा वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी मनोज शिंदे यांच्या हस्ते जवळपास तीन हजार ऊसतोड कामगारांना किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या पुढाकारातून आयोजित या उपक्रमाला शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह ◀◀ पान ३ वर

पिंपळगाव घाट ते चाकरवाडी पायी दिंडी चा सोहळा

२५ वर्षापासूनचा भाविकांचा स्तुत्य उपक्रम

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा पासून जवळच असलेल्या पिंपळगावघाट येथील ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांचे भक्ती गण पिंपळगाव घाट पासून ते चाकरवाडी मंदिरापर्यंत पायी प्रवास करून गेल्या पंचवीस वर्षापासून दर एकादशीला भाविक भक्त पायी दिंडीत माऊलीचा नाम घोष करीत पायी दिंडीने भाविक भक्त चाकरवाडी येथे जाऊन श्री ज्ञानेश्वर माऊली यांच्या समाधीचे दर्शन घेतात



पिंपळगाव घाट येथील विशेषता तेलप वस्ती मधील राहणारे भाविक भक्त प्रत्येक एकादशी दिवशी श्री क्षेत्र चाकरवाडी येथे जाऊन दर्शन घेतात सदर सोहळ्यामध्ये सर्वश्री अशुबा तेलब चोपदार लिंबराज तेलप विणेकरी भानुदास तेलप झेंडेकरी भर तरी तेलप अनुरथ तेलप नाईकवाडे मंडळातील यांच्यासह इतर जवळपास ◀◀ पान ३ वर

आष्टी पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी रोहित सायंकड, तर व्हाईस चेअरमनपदी बाबूराव आंधळे यांची बिनविरोध निवड!

सहकार क्षेत्रात नव्या नेतृत्वाचा उदय; संचालक मंडळाच्या विशेष सभेत निवडीवर शिक्कामोर्तब

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, आष्टीच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदासाठी झालेल्या निवडणुकीत चेअरमनपदी रोहित सायंकड, तर व्हाईस चेअरमनपदी बाबूराव आंधळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता पतसंस्थेच्या कार्यालयात संचालक मंडळाच्या विशेष सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली.



निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एस. पी. गायकवाड यांनी काम पाहिले, तर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पतसंस्थेचे सचिव विलास सोनवणे यांनी जबाबदारी सांभाळली. विद्यमान चेअरमन असलम बेग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या विशेष सभेत चेअरमनपदासाठी नवनियुक्त कनिष्ठ अभियंता रोहित सायंकड आणि व्हाईस चेअरमनपदासाठी बाबूराव आंधळे यांचे प्रत्येकी एकमेव अर्ज दाखल झाले होते.

दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी रोहित सायंकड यांची चेअरमनपदी, तर बाबूराव आंधळे यांची ◀◀ पान ३ वर

महासांगवी ग्रामपंचायत १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून झालेल्या विकासकामांमध्ये भ्रष्टाचार-आबा गर्जे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील महासांगवी ग्रामपंचायतीमध्ये सन २०२२ ते २०२६ या कालावधीत १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून झालेल्या विकासकामांमध्ये आर्थिक अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या कामांची प्रत्यक्ष चौकशी व स्पॉट पंचनामा करण्यात यावा, अन्यथा आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा आबा गर्जे यांनी दिला आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, महासांगवी येथील सन २०२२ ते २०२६ या कालावधीतील १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्यात आलेल्या विविध विकासकामांची माहिती माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागवून प्राप्त करण्यात आली आहे. प्राप्त कागदपत्रांचा अभ्यास केल्यानंतर अनेक कामांबाबत गंभीर शंका निर्माण झाली असून, कागदपत्रांमध्ये विविध कामे झाल्याचे व निधी खर्च झाल्याचे दाखवण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्षात बरीच कामे झाली नसली किंवा कागदपत्रांतील कामांमध्ये तफावत असल्याने याची निष्पक्ष चौकशी होणे अत्यंत आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

प्रमुख मागण्या:

सन २०२२ ते २०२६ या कालावधीतील १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून झालेल्या सर्व कामांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात यावी.

प्रत्येक कामाचा स्पॉट पंचनामा करून फोटो व व्हिडिओसह वस्तुस्थितीची नोंद करण्यात यावी.

संबंधित सर्व कामांचे मंजूर निधी, अंदाजपत्रक, प्रशासकीय मंजुरी, तांत्रिक मंजुरी, कामाचे आदेश, मोजमाप पुस्तिका (चइ), बिले, व्हाउचर व इतर सर्व संबंधित कागदपत्रांची सखोल तपासणी करण्यात यावी.

कागदपत्रांमध्ये दाखवण्यात आलेली कामे व प्रत्यक्ष जागेवरील कामे यांची तुलना करण्यात यावी. प्रत्यक्षात काम झाले नसताना, अपूर्ण काम पूर्ण दाखवून किंवा चुकीच्या पद्धतीने बिले ◀◀ पान ३ वर

परळी नगर परिषदेत आधुनिक वाहनांची भर; सक्शन मशीन, आपत्ती व्यवस्थापनासाठी बोट आणि बुलेट दाखल!

परळी । प्रतिनिधी

शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासह आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज करण्याच्या दृष्टीने परळी नगर परिषदेत नवीन वाहनांची भर पडली आहे. नगर परिषदेकडे सक्शन मशीन, आपत्ती व्यवस्थापनासाठी बोट तसेच बुलेट उपलब्ध झाली असून, या वाहनांचे लोकार्पण नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी आणि सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत करण्यात आले.



शहरातील स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन तसेच विविध नागरी सुविधांच्या कामांना गती देण्यासाठी सक्शन मशीन उपयुक्त ठरणार आहे. तर पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पूरस्थिती अथवा जलमय भागातील आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी आपत्ती व्यवस्थापनाची बोट महत्त्वाची भूमिका बजावू शकते. याशिवाय बुलेटमुळे आपत्कालीन कामकाज आणि क्षेत्रीय पातळीवरील हालचालींना मदत होणार आहे. शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेता नगर परिषदेकडे आवश्यक यंत्रसामग्री आणि साधनसामग्री उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. नव्याने दाखल झालेल्या या वाहनांमुळे स्वच्छता व आपत्ती व्यवस्थापनाच्या कामकाजाला अधिक बळ मिळणार आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, यांच्यासह सर्व सभापती, गटनेते, नगरसेवक आणि नगर परिषद अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

केंद्र सरकारने कापूस, उत्पादक शेतकऱ्याचे वाटोळं केलं -करपे, आमटे

गुजराती कापड उद्योजकांसाठी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचा बळी, सरकारच्या अधिसूचनेची अंथरवन पिंपरी येथे होळी

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दुष्काळाचे सावट आहे. दुष्काळामध्ये थोडाफार कापूस शेतकऱ्याला झाला मात्र कापसाचे भाव वाढत असताना केंद्रातील सरकारने विदेशातून येणाऱ्या कापूस आयात शुल्क शून्य टक्के पर्यंत घटवले. यामुळे दुष्काळग्रस्त कापूस, शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले असून कापसाचे दर कमी झाले. मोदी सरकारने गुजराती व अन्य कापड मिल उद्योजकांकरिता दुष्काळी शेतकऱ्यांचा बळी दिला असल्याचा संताप शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे व क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी व्यक्त केला.

बीड तालुक्यातील अंतरंग पिंपरी येथे केंद्र सरकारने आयात धोरणाविषयी काढलेल्या अधिसूचनेची होळी करण्यात आली यावेळी आमचे व करपे बोलत होते.केंद्र सरकारने विदेशातून येणाऱ्या कापसावरील आयात शुल्क कमी केले आहे. यामुळे दुष्काळी भागातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या कापसाला योग्य भाव मिळणार नाही. आधी दुष्काळाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे उत्पन्नाचे दुसरे मार्ग बंद झाले आहेत शेतीवरच उपजीविका करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी कापूस आयात धोरण हे जीवन मरणाचा विषय झाला आहे त्यामुळे शेतकऱ्यांकडे आहे त्या शेतीमालाला आधीच भाव मिळत नाही त्यात आयात धोरणामुळे कापसाचे भाव गडगडणार अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांचा आर्थिक गाडा कसा चालणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. सरकारने आयात धोरण चालू केल्याने थोडेफार काही व्यापारी खुश होतील तेव्हा व्यापाऱ्यांकडुन कमिशन मिळेल पण या कमिशन पायी देशातील शेतकऱ्याचे अतोनात नुकसान होत आहे शेतकऱ्याकडे कापूस थोडाफार असल्यामुळे त्या कापसाला योग्य भाव मिळत नाही. यामुळे सरकारने तात्काळ कापसावरील आयात शुल्क वाढवावे अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे व शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी केले आहे. या वेळी प्रा अशोक शिंदे, प्रा.बापु शिंदे,सतिष प्रभाळे, जितेशशिंदे,अर्जुन शिंदे,हनुमान कुटे,उध्दव शिंदे,पडित शिंदे,,अरुण जिजा शिंदे,विक्रम अण्णा शिंदे ,चेअरमन पाडुरग शिंदे ,धुराजी प्रभाळे, ईसमाईल सय्यद,बाबू गिरी, अशोक शिंदे,वसंत शिंदे,मिट्टू कुटे,अशोक यादव



२२० कोटींच्या रस्त्याला काम पूर्ण होण्याआधीच तडे! यश कन्स्ट्रक्शनच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह


सिमेंट रस्त्याला चिरा अन् खड्ड्यांचे ग्रहण!,काम पूर्ण होण्यापूर्वीच रस्त्याची दुरावस्था; बांधकामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह


युसूफवडगाव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव मार्गे जाणाऱ्या लोखंडीसावरगाव ते माळेगाव या राज्य मार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नसतानाच नवीन सिमेंट काँक्रीट रस्त्यावर ठिकठिकाणी चिरा पडू लागल्या असून काही ठिकाणी खड्डेही निर्माण झाले आहेत. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चून तयार होत असलेल्या या रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

दोन जिल्ह्यांना तसेच दोन राष्ट्रीय महामार्गांना जोडणारा हा महत्त्वाचा राज्य मार्ग गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत खराब अवस्थेत होता. रस्त्यावरील खड्डे आणि दुरवस्थेमुळे वाहनधारकांसह नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. नमिताताई मुंदडा यांच्या प्रयत्नातून या रस्त्यासाठी तब्बल २२० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यानंतर शासनाच्या नियमानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन या रस्त्याचे काम यश कन्स्ट्रक्शन कंपनीला मिळाले. गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेले काम आता अंतिम टप्प्यात आले आहे.







मात्र, रस्ता पूर्ण होण्यापूर्वीच काही ठिकाणी सिमेंट काँक्रीटला चिरा पडल्या आहेत, तर काही ठिकाणी खड्डे तयार झाले आहेत. विशेष म्हणजे, काही ठिकाणी निर्माण झालेल्या खड्ड्यांवर सिमेंट मसाला भरून वरवरची मलमपट्टी करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येत आहे. मात्र, अशा तात्पुरत्या दुरुस्तीमुळे रस्त्याची टिकाऊपणा आणि गुणवत्ता याबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. वाहतुकीच्या दाबामुळे अशा ठिकाणी पुन्हा खड्डे पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे केवळ वरवरची मलमपट्टी न करता संबंधित ठिकाणचे खराब झालेले काँक्रीट नियमानुसार काढून योग्य तांत्रिक पद्धतीने नवीन काँक्रीट पॅच तयार करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर रस्त्यावर पडलेल्या मोठ्या चिरांची कारणमीमांसा करून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा नवीन रस्ता काही दिवसांतच खराब होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने जबाबदारी झटकू नये!

जनतेच्या पैशातून कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात येणाऱ्या या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामात गुणवत्ता राखली जाणे अपेक्षित आहे. त्यामुळे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26